जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन "मुसाफिर"-९८२२०२०६९१



### नामस्मरणाची वारी... जीवन तारी...

कलियुगाची सुरुवात झाली... अभिमन्यू पुत्र व पांडवांचा नातू राजा परिक्षित राज्य करीत होता. एक दिवस राजा परिक्षिताला एक दुष्ट माणूस एकच पाय असलेल्या एका बैलाला व गायीला त्रास देताना दिसला. राजाने ध्यानसाधनेतून याचं सत्य, रहस्य जाणून घेतलं. तो विचित्र बैल म्हणजे धर्म होता आणि ती गाय म्हणजे धरणीमाता.

जेव्हा परिक्षिताने त्या त्रास देणाऱ्या दुष्टाला तू कोण असं विचारलं तेव्हा त्याने उत्तर दिलं, ''मी कलियुग. आता मी धरतीवर राज्य करायला आलो आहे.''

''परंतु माझ्या राज्यामध्ये मी तुला जागा देणार नाही, तू ताबडतोब इथून चालता हो.'' राजा परिक्षित म्हणाला.

''राजा, माझं येणं हे आधीच ठरलेलं आहे. नियती आहे ही. तू मला नाकारू शकत नाही'' असं म्हणून कलीने त्याच्याकडे आश्रय मागितला.

राजा विचारमग्न झाला. कारण आश्रय मागायला आलेल्या कुणालाही ठार करणं हे नियमांच्या विरुद्ध होतं. अखेरीस राजा म्हणाला, ''मी तुला चार गृहांमध्ये राहण्यास परवानगी देतो - जुगारगृह, मद्यालय, निष्कारण हिंसा अन् स्त्रियांशी लगट.

कलीने आणखी काही जागा अधिक घेतल्या. त्या म्हणजे खोटेपणा, गर्विष्ठपणा, वासना, मत्सर, शत्रुत्व व सोने. इथे कलीचं समाधान झालं.

आजच्या कलियुगात धर्म, जीवनाच्या पारंपरिक रिती, विवेक, नैतिकता जवळपास लयास गेले आहेत. पण सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो की, ''धर्माच्या अनुपस्थितीतही तू माझ्यापर्यंत पोहोचू शकतो. श्रद्धेच्या मार्गावरून आलेल्या पापींनाही मी भेटू शकतो. सद्हेतूने काम करायची केवळ इच्छा ठेवली तरी माझा त्याला आशीवाद लाभेल.

प्रार्थनामध्ये माझ्या (परमेश्वराच्या) नामाचा जप करणं पुरेसं आहे. कृष्णाचं - विठोबाचं - इच्छित देवाचं नाव घ्या. यातूनच तारून जाता येऊ शकेल.


आपण साध्यासुध्या आयुष्यात या नामस्मरणाची प्रचिती, अनुभूती घेतो. आत्यंतिक श्रद्धा, भोळीभाबडी पंढरीची हजारो वर्षांपासूनची वारी याचीच द्योतक आहे.

## कोणत्याही क्षणी नगर-पुणे महामार्गावर 'रस्ता रोको'

(पान १ वरुन)

या ठिकाणी येऊन विडी कामगार महिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर सदर कचरा संकलन केंद्र हटवण्यासाठी महानगरपालिकेला योग्य तो पत्रव्यवहार करून तातडीने उपयोजना करण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी विडी कामगार महिलांनी सांगितले की महानगरपालिकेने आमचा गुदमरलेला श्वास मोकळा न केल्यास विडी कामगार महिला व स्थानिक रहिवासी मिळून प्रशासनाला कुठलीही पूर्वसूचना न देता नगर - पुणे महामार्ग रोखण्यात येईल व यामधून काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा कडक इशारा दुर्गंधीने बेजार झालेल्या विडी कामगार महिला व परिसरातील नागरिक यांनी यावेळी दिला आहे.

## श्रीधरानंद शास्त्री पातुरकर बाबा यांचे देहावसान



श्रीरामपूर - तालुक्यातील खोकर येथील दत्त मंदिर (महानुभाव आश्रम) चे श्रीधरानंद शास्त्री पातुरकर बाबा (वय ८२) यांचे १ जून रोजी दुपारी ४:३० वा. देहावसान झाले.

## मच्छिंद्र दानवे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - नगर - छत्रपती संभाजीनगर रोडवरील गजराजनगर येथील रहिवासी मच्छिंद्र रामभाऊ दानवे (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने पुणे येथील ससून रुग्णालयात निधन झाले. नगर येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मच्छिंद्र दानवे हे अत्यंत शांत, संयमी, मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुली, मुलगा, जावई, नातू असा परिवार आहे. पत्रकार विजय मते यांचे ते व्याही होते.

## आसराबाई वरखडे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - नेवासा तालुक्यातील मुरडे (देवगड) येथील आसराबाई मोहिनीराज वरखडे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मुरडे देवगड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा भक्त मंडळातील ज्येष्ठ सेवेकरी बाबासाहेब वरखडे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## भास्कर चव्हाण यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीरामपूर न.प.चे सेवानिवृत्त कर्मचारी भास्कर रतन चव्हाण (वय ६८) यांचे ३१ मे रोजी दुपारी ४:३० वा. अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई नातवंडे असा परिवार आहे. कोपरगाव येथील जि.प.शाळेचे शिक्षक दत्तात्रय चव्हाण व श्रीरामपूर नगर परिषदेचे जन्म - मृत्यू विभागातील कर्मचारी ज्ञानेश्वर चव्हाण यांचे वडील, बाळासाहेब, सुनिल, दिलीप, कुमार व दशरथ चव्हाण यांचे चुलते होत

# नगर शहरातील बांगलादेशी घुसखोर, 'रोहिंग्या'वर तातडीने 'कारवाई' करावी

### शिवसेना ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाची पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - नगर शहरात सध्या मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोरांचा, रोहिंग्यांचा सुळसुळाट असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. बाजारपेठ, चौक व वसाहतींमध्ये महिला व युवतींशी संपर्क साधून त्रास देणारे, बांगड्या विकणारे, मेहंदी लावणारे, गोंदवणारे असे अनेक संशयित नागरिक शहरात खुलेआम वावरत आहेत. या संपूर्ण प्रकाराकडे लक्ष वेधून, शिवसेना ठाकरे गटाचे युवासेना राज्य सहसचिव व माजी नगरसेवक विक्रम राठोड यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन दिले आहे. या घुसखोरांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व त्यांना परत पाठवण्याची मागणी त्यांनी केली आहे.



नगर शहरात वाढलेल्या बांगलादेशी घुसखोर, रोहिंग्यावर तातडीने कारवाई करावी या मागणी बाबत पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी चर्चा करताना विक्रम राठोड व शिष्टमंडळ

या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, शहराचे मुख्य बाजारपेठ असलेल्या कापड बाजारात मोची गल्ली, घास गल्ली, गंज बाजार, पंचपिर चावडी, कोठला स्टॅन्ड, मुकुंदनगर, भूषण नगर, एसटी स्टँड, माळीवाडा येथील दुकाने व्यावसायिक तसेच मजूर कारागीर म्हणून या बांगलादेशी घुसखोरांचा, रोहिंग्या यांचा वावर मोठ्या प्रमाणावर आहे.

या घुसखोरांची ओळखपत्रे नाहीत, बनावट आधार/रेशनकार्ड वापरले जात आहे, तसेच काहींची नावे मतदार यादीत सुद्धा आढळून आली आहेत, हे अत्यंत चिंताजनक आहे. हे लोक अनेकदा महिलांशी अश्लील वर्तन करत असल्याच्या तक्रारी समोर येत असून, हॉटेल उद्योगातही वेटर, कुक म्हणून यांचा वावर वाढला आहे.

त्यांच्याकडे ओळखपत्र मागितले असता ते उडवा उडवीची उत्तरे देतात. गेल्या पंधरा वर्षापासून आपण नगरमध्येच राहत असून मूळचे कुठले असे विचारले असता ते युपी, बिहारी, बंगाली किंवा आसाम, मिझोरामचे असल्याचे सांगतात.

या संपूर्ण प्रकाराकडे लक्ष वेधून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे) युवासेना राज्य सहसचिव व माजी नगरसेवक विक्रम राठोड यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन दिले आहे. या घुसखोरांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व त्यांना परत पाठवण्याची मागणी त्यांनी केली आहे.शहराची शांतता व महिलांची सुरक्षितता धोक्यात येत असताना तत्काळ कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

यावेळी उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष अंबादास शिंदे, राष्ट्रनिर्माण पार्टीचे उत्कर्ष गीते, दिलदार सिंग बीर, शुभम मीरांडे, पंकज राठोड, शहर प्रमुख प्रतीक भंडारी, श्याम सोनवणे, मृणाल भिंगारदिवे, नरेश भालेराव, महेश शेळके, विकी पवार, मनोज चव्हाण, जिग्नेश जग्गड, अक्षय नागापुरे, श्रीकांत चिमटे, सुनील त्रिपाठी, सुमित धेंड, शंकर दांगडे आदी उपस्थित होते.

## नगरमध्ये युवकास मारहाण करत पिस्तुलातून झाडल्या गोळ्या

(पान १ वरुन)

राहुल सांगळे व भीमराज आव्हाड हे आले. तेव्हा भीमराव आव्हाड याने त्याच्या हातातील पिस्तुलाने फिर्यादीच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. पण नेम चुकल्याने कोणालाही गोळी लागली नाही. या प्रकाराने घाबरुन फिर्यादी व त्यांचे मित्र तेथून पळून गेले. याप्रकरणी प्रमोद घोडके यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी भीमराज आव्हाड, राहुल सांगळे, राजवाडा हॉटेलचे मालक मयूर फणसे, तेथे काम करणारा कुणाल मराठे, आकाश नसाणे यांच्याविरुद्ध बी एन एस कलम १०९ (१), ११५ (२), ३५२, १८९ (२)(४), १९१ (२) (३), १९०, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५, २७ प्रमाणे गुन्हा दाखल केला पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजपूत हे करीत आहे.

दरम्यान गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी यातील मयूर फणसे, कुणाल मराठे, आकाश नसाणे या तिघांना ताब्यात घेतले असून भीमराज आव्हाड व राहुल सांगळे पसार झाले आहेत. पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

# अहिल्यानगर शहर आणि तालुक्यातील डमी कॉलेजकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

### खाजगी क्लासेस चालकांच्या संगनमताने केली जातेय पालकांकडून लूट

नगर - नगर शहरात खाजगी क्लासेस व त्यांच्या मालकांनी शिक्षणाच्या नावाखाली धंदा सुरू केला आहे. लाखो रुपये फी विद्यार्थी व पालकांकडून घेतली जाते. ही लुटमार करण्यामागे शहरातील तसेच तालुक्यातील काही डमी बोगस कॉलेज चा सहभाग आहे. याकडे शिक्षणाधिकारी कार्यालयाचे दुर्लक्ष होत असून याची सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याबाबत नितीन भूतारे यांनी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना मेल करून त्यांचे लक्ष वेधले आहे. अनेक वर्षापासून खाजगी क्लासेस व ज्युनिअर कॉलेज यांच्या संगनमताने विद्यार्थी व पालकांना लुटण्याच्या हा व्यवसाय सुरू आहे. यातून अशा काही कॉलेजमध्ये जे विद्यार्थी प्रवेश घेतात त्यांची हजेरी ही ठरलेल्या वेळापत्रक वेळेनुसार कॉलेजला न राहता ती त्या खाजगी क्लासला असते व संपूर्ण शिक्षण हे क्लासेस मध्ये चालते संगणमताने सुरु झालेला हा व्यवसाय अनेक वर्षांपासून नगर शहरात व तालुक्यात सुरू आहे. याकडे शिक्षणाधिकाऱ्यांचं लक्ष नाही, शासनाच्या आदेशानुसार अकरावी व बारावी या वर्गातील विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये संपूर्ण हजेरी ही कॉलेजच्या वेळेनुसार असणे बंधनकारक असताना देखील अनेक कॉलेजमध्ये शासन निर्णयानुसार बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी घेतली जात नाही. सी सी टिव्ही प्रत्येक वर्गात आहेत का नाही हे पहिल्या जात नाही. त्यामुळे अनेक कॉलेजेस मध्ये विद्यार्थ्यांची हजेरी ही कॉलेजच्या वर्गात नसून खाजगी क्लासेस मध्ये असते. अश्या प्रकारे नगर शहरात बोगस पद्धतीने कामकाज करत काही कॉलेजेस करत असल्याचे या मागे दिसून आले आहे असा आरोप नितीन भुतारे यांनी शिक्षण मंत्री यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

### खाजगी क्लासेस चालक ठरवितात प्रवेश कुठे द्यायचा

खाजगी क्लासेस व ज्युनिअर कॉलेज यांच्या हित संबंधामुळे विद्यार्थ्याने प्रवेश कुठे व कोणत्या कॉलेज ला घ्यायचा हा निर्णय खाजगी क्लासेस चे मालक घेतात. हे अनेक वर्षापासून शिक्षण विभागाला माहीत असून त्या कडे आर्थिक फायद्यापोटी व आर्थिक लागेबांधे असल्यामुळे दुर्लक्ष्य केल्याचे दिसून येते.

खाजगी क्लासेस व ज्युनिअर कॉलेज यांचा स्कॅम अनेक वर्षापासून नगर शहरात सुरू आहे, तरीही आजपर्यंत कुठेही नगर शहरात अश्या बोगस खाजगी क्लासेस व कॉलेज वर कारवाई झाल्याचे निदर्शनास आले नाही असा आरोप नितीन भुतारे यांनी केला आहे.

त्यामुळे सुरू होणाऱ्या अकरावी, बारावी मधील विद्यार्थ्यांच्या २०२५-२०२६ या नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची हजेरी हि कॉलेजच्या वर्गात शैक्षणिक वेळापत्रक वेळेनुसार बंधनकारक करा. जर शासन निर्णयानुसार बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी लावली जात नसेल आणि विद्यार्थ्यांची हजेरी शिक्षण अधिकारी यांच्याकडून तपासली जात नसेल तर शिक्षण अधिकारी यांच्यावर कारवाई करा, अशी मागणी नितीन भुतारे यांनी शिक्षण मंत्री यांना केली आहे.

# सारसनगर विभाग टँकरमुक्त करण्यासाठी ठाकरे शिवसेना कटिबद्ध राहील

### किरण काळे यांचे प्रतिपादन; मनपा निवडणूक पार्श्वभूमीवर सारसनगर - स्टेशन रोड विभागाची बैठक

नगर - सारसनगर स्टेशन रोड हा विभाग गेल्या अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्याच्या समस्येशी झुंजतो आहे. अनेक योजना राबविल्या गेल्या, मोठा निधी खर्च केला गेला. मात्र आजही या भागामध्ये दररोज नळाला पाणी येत नाही. पुरेशा दाबाने पाणी न येणे, अवेळी विशेषतः रात्रीच्या वेळी पाणी येणे, अस्वच्छ पाणी येणे यामुळे नागरिक हैराण, हवालदिल आहेत. दुर्दैव म्हणजे आजही या भागातील काही ठिकाणी मनपा टँकरने पाणीपुरवठा करते. पिण्याच्या पाण्यासारखी मूलभूत गरज भागवण्यात अपयशी ठरलेले प्रशासन, लोकप्रतिनिधी यांना जनता आता माफ करणार नाही. आगामी मनपा निवडणुकीत या विभागात सक्षम उमेदवार देणार असून सारसनगर विभाग कायमचा टँकरमुक्त करण्यासाठी ठाकरे शिवसेना कटिबद्ध राहील, असे प्रतिपादन शहर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.



शहरप्रमुख किरण काळे यांच्या अध्यक्षतेखाली माजी नगरसेवक सुनील त्रिपाठी यांच्या निवासस्थानी शिवसेना ठाकरे पक्षाच्या सारसनगर, स्टेशन रोड विभागाची बैठक पार पडली. यावेळी शिवसैनिक उपस्थित होते.

शिवसेना ठाकरे पक्षाच्या सारस नगर - स्टेशन रोड विभागाची शिवसैनिकांची बैठक माजी नगरसेवक सुनील त्रिपाठी यांच्या निवासस्थानी पार पडली. यावेळी काळे बोलत होते. यावेळी सुनील त्रिपाठी, माजी उपशहर प्रमुख दीपक भोसले, कामगार सेनेचे नेते विलास उबाळे, सारसनगरचे विकेश गुंदेचा, महिला आघाडीच्या शितल त्रिपाठी, युवा सेना जिल्हाप्रमुख पप्पू भाले, माजी नगरसेवक प्रशांत ठुबे, सुदर्शन गोहेर, मिलन सिंग, गिरीश हांडे, अभय बडे, फरहान शेख, कामगार सेनेचे शहरप्रमुख गौरव ढोणे, युवा सेना अहिल्यानगर विधानसभा प्रमुख आनंद राठोड, सुनील भोसले, व्यापारी आघाडीचे महावीर मुथा, गणेश आपरे, शंकर आव्हाड, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, जयराम आखाडे, रोहिदास भालेराव, बाबासाहेब वैरागर, राजेंद्र तरटे, दिपक काकडे, विनोद शिरसाठ, सचिन कापुरे, सचिन भालेराव, किशोर कोतकर आदीं उपस्थित होते.

काळे पुढे म्हणाले, या प्रभागात, विभागात झालेले सिमेंट काँक्रीटीकरणाच्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा अनेक ठिकाणी चांगला नाही. काही ठिकाणी सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावरच पुन्हा डांबरीकरणाचे काम करण्याचा प्रताप मनपा प्रशासनाने केला होता. त्याचा यापूर्वीच लाईव्ह भांडाफोड आपण केला आहे. आजही परिसरात असे अनेक रस्ते आहेत की ज्यांची कामे रखडलेली आहेत. ती प्रशासनाच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी शिवसेना पुढाकार घेईल.

सुनील त्रिपाठी म्हणाले, सन २००६ मध्ये समर्थ नगर या ठिकाणी या विभागाकरिता पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण झाले. तब्बल वीस वर्ष होत आले. तरी देखील या टाकीत आजपर्यंत पाण्याचा एक थेंब सुद्धा पडलेला नाही. लाखो रुपये जनतेच्या तिजोरीतील खर्च करून देखील जनता जर लाभा पासून वंचित असेल तर एवढा मोठा खर्च करून ही टाकी बांधलीच कशासाठी, असा सवाल यावेळी त्रिपाठी यांनी उपस्थित केला. त्याआधी सन २००४ सालापासून या विभागात टँकरने पाणीपुरवठा सुरू केला होता. आजही तो चालू आहे. शिवसेनेच्या माध्यमातून हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आगामी मनपा निवडणूक ताकतीने लढवायची आहे.

विकेश गुंदेचा म्हणाले, परिसरामध्ये मनपाने काही उद्यानांची कामे केली आहेत. मात्र या उद्यानांची देखभाल उद्यान विभाग करत नाही. त्यामुळे नागरिकांना त्यांचा लाभ घेता येत नाही. परिसरातील काही ओपन स्पेस हे नागरिकांसाठी खुले करण्याची गरज आहे.

महावीर मुथा म्हणाले, स्टेशन रोड परिसरामध्ये काही भागांमध्ये पाण्याचा थेंब येत नाही. नागरिक वारंवार लोकप्रतिनिधी, मनपा प्रशासनाकडे तक्रारी करून, खेटा मारून मेटाकुटीला आले आहेत. तरी यांना पाझर फुटायला तयार नाही. त्यामुळे आगामी मनपा निवडणुकीत लोकांच्या प्रश्नांशी बांधिलकी असणारे उमेदवार पक्षाच्या वतीने दिले जावेत अशी मागणी मुथा यांनी केली.

शितल त्रिपाठी म्हणाल्या, घनकचरा विभागाकडून कचरा संकलन नीट केले जात नाही. वास्तविक पाहता तीनशे पासष्ट दिवस घंटागाडी लोकांच्या दारात दररोज यायला पाहिजे. मात्र ती काही ठिकाणी दिवसा आड, तर काही ठिकाणी दोन-तीन दिवसांनी येते. यामुळे नागरिकांचे, विशेषत: महिला भगिनींचे मोठे हाल होतात. ओला कचरा देखील घरात राहिल्यामुळे दुर्गंधी सुटते. यामुळे संपूर्ण कुटुंबाच्याच आरोग्याला धोका निर्माण होत आहे. ही समस्या प्रशासनाच्या माध्यमातून निकाली काढण्यासाठी शिवसेना पुढाकार घेईल.

# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उपाययोजनांसाठी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाची बैठक

### घरोघरी सर्वेक्षण करून साथरोग व जलजन्य आजारांच्या रुग्णांची माहिती संकलित करा; चार महिने सातत्याने धूर, औषध फवारणी करण्याच्या उपायुक्तांच्या सूचना

नगर - पावसाळा सुरू झाला असून येत्या काही दिवसात मान्सून सक्रिय होणार आहे. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या जलजन्य आजारांच्या, तसेच साथ रोगांच्या पार्श्वभूमीवर सर्व आरोग्य केंद्रात सर्व सुविधा उपलब्ध राहतील, याची दक्षता घ्यावी. आशा सेविका, परिचारिकांमार्फत घरोघरी सर्वेक्षण सुरू करावे, रुग्णांची माहिती संकलित करावी, पाण्याच्या टाक्या, हौदात बेट टाकावे. डेंग्यूचे रुग्ण आढळलेल्या भागात तत्काळ औषध व धूर फवारणी सुरू करावी, असे निर्देश उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी आरोग्य विभागाला दिले.

पावसाळ्यातील जलजन्य आजार, साथरोग, डास नियंत्रण संदर्भात महापालिकेत बैठक पार पडली. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी, महापालिकेचे सर्व वैद्यकीय अधिकारी, पाणीपुरवठा व शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

डायरीया, कावीळ, गॅस्ट्रो, टायफाईड या जलजन्य आजारांचे, तसेच, मलेरिया, डेंग्यू, चिकन गुनिया आदी आजारांचे रुग्ण पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात आढळतात. आशा सेविका, परिचारिकांनी दररोज घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावे. रुग्णांची माहिती संकलित करावी.



पावसाळ्यातील जलजन्य आजार, साथरोग, डास नियंत्रण संदर्भात महापालिकेत बैठक पार पडली.

खाजगी रुग्णालयाकडून रोज रुग्णांची माहिती संकलित करावी. सर्वेक्षणादरम्यान घर व आवारातील पाणीसाठा, टाक्या, हौदांची तपासणी करून, डास आळी सापडल्यास तेथील पाणी काढून टाकावे, डास अळीनाशक द्रव्य, पाण्यात बेट टाकावे, डेंग्यूचे रुग्ण आढळून आलेल्या घर परिसरात औषध व धूर फवारणी करावी. सर्व उपाययोजनांबाबत नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या. धूर फवारणीसाठी १५ दिवसाची सायकल निश्चित करून प्रत्येक ठिकाणी नियमित उपाययोजना पावसाळा चार महिने कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

डेंग्यू व इतर आजारांबाबत डास प्रकार, आजारची लक्षणे, उपचाराबाबत व्यापक जनजागृती करावी. महानगरपालिकेमार्फत शहरातील सार्वजनिक इमारतीमध्ये टॉयलेट व्हेंट पाईपला नायलॉन जाळी लावण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. खाजगी बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी, टायर व्यवसायिक, इतर बेसमेंट असलेल्या आस्थापना आदी ठिकाणी मलेरिया कर्मचारी तपासणी करणार आहेत. डास किंवा अळी सापडणाऱ्या ठिकाणी संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. नागरिक व व्यावसायिकानी घरात, व्यवसायच्या ठिकाणी डास अळी निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, वेळीवेळी आठवड्यातून एकदा पाणीसाठे रिकामे करून आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे. दरम्यान, धूर व औषध फवारणीसाठी मलेरिया विभाग प्रमुख तथा बायोलॉजिस्ट डॉ. सृष्टी बनसोडे (८६०००७१०९१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज खा आक्रोड

अक्रोड, ज्याला सुका मेव्याचा राजा म्हणूनही ओळखले जाते, ते शतकानुशतके त्यांच्या असाधारण आरोग्य फायद्यांसाठी ओळखले जाते. हे लहान, मेंदूच्या आकाराचे आक्रोड केवळ स्वादिष्टच नाहीत तर पोषक तत्वांचे एक मोठे भांडार देखील आहेत. वाळलेले अक्रोड खाणे देखील फायदेशीर आहे, परंतु ते भिजवून खाल्ल्याने त्यांचे फायदे अनेक पटींनी वाढतात. रात्रभर पाण्यात अक्रोड भिजवण्याची सोपी प्रक्रिया त्यांना पचवण्यास सोपे करते आणि त्यातील पोषक तत्वे शरीराद्वारे चांगल्या प्रकारे शोषली जातात. अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते, जे मेंदूच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. त्याने स्मरणशक्ती, एकाग्रता आणि आकलन क्षमता सुधारण्यास मदत करतात.

## पाककला

### गव्हाचे कुरकुरे

**साहित्य :** १ कप गव्हाचे पीठ किंवा मैदा, १ टेबलस्पून कसूरी मेथी, १/२ टीस्पून जीरे, १ टीस्पून ओवा, १/४ टीस्पून हळद, चवीप्रमाणे मीठ, २ टेबलस्पून तेल, तळण्यासाठी तेल, किचन मधील भाजी कापायची कात्री

**कृती :** एका बाऊलमध्ये गव्हाचे पीठ घेणे. त्यात सर्व मसाले घालून मिक्स करून घेणे. ओवा व कसुरी मेथी हातावर कुस्करून घालणे. म्हणजे त्याचा स्वाद छान लागतो. सर्व व्यवस्थित मिक्स करून झाल्यावरती तेल घालून सर्व पिठाला व्यवस्थित चोळून घेणे.पिठाची मूठ तयार झाली पाहिजे. थोडे-थोडे पाणी घालून चपातीला कणिक मळतो, त्यापेक्षा थोडीशी घट्ट कणिक मळून घेणे. गॅसवर कढईत तेल घालून, तापत ठेवणे. पीठ एकदा व्यवस्थित मळून घेणे व त्याचे तीन उंडे तयार करून घेणे. किचन मधील कात्री घेऊन, हव्या त्या आकाराचे छोटे-छोटे तुकडे कात्रीने करून घेणे. तेल तापल्यानंतर गॅस मध्यम आचेवर ठेवावा. कढईत जेवढे बसतील, तेवढे कुरकुरे घालून घेणे. सतत हलवत राहणे दोन्ही बाजूंनी छान लाल झाली ते काढून घ्यावे अशा प्रकारे सर्व कुरकुरीत तळून घेणे.

## वास्तू

### घरात पाळावी का मांजर?

✻ जर पाळीव मांजरीने घरात पिल्लांना जन्म दिला, तर यामुळे कुटुंबातील सदस्यांच्या प्रगती होते. हे शुभ संकेत असतात. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा येत नाही.

✻ जर तुमच्या घरी अचानक सोनेरी रंगाची मांजर आली आली तर तुमच्या घरात सौभाग्य येते. भविष्यासाठी हे खूप शुभ मानले जाते. तसेच यामुळे आर्थिक लाभ मिळतो. यामुळे अर्धवट राहिलेली कामे पूर्ण होतात.

## सल्ला

गुळाचा पाक बनवताना अगोदरच कढईला तूप लावून मग पाक केलातर गुळाचा पाक कढईला चिटकत नाही.

## सौंदर्य

सकाळी उठल्यानंतर आपला चेहरा थंड पाण्याने धुवावा. याने चेहरा धुतल्यास त्वचेवरील पोअर्स बंद होतात. चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल कमी होण्यास मदत मिळते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३ जून २०२५

**दुर्गाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, पूर्वा २४।५९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहाल. मोठ्यांचा सल्ला घ्याल. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल.

**वृषभ :** आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील. मनावर नियंत्रण ठेवाल. मित्रांचा सहयोग मिळेल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल.

**मिथुन :** भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल.

**कर्क :** इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांची सल्ला घेऊन पाउल टाका. शुभ वार्ता देखील मिळतील. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल.

**सिंह :** वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे.

**कन्या :** धर्मविषयक कामामध्ये पैसा खर्च होईल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल.

**तूळ :** आपणास समाधानकारक स्थिती मिळेल. आर्थिक लाभ मिळेल. आरोग्याला त्रास होऊ शकतो.

**वृश्चिक :** भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. कुटुंबियांच्या सहवासामुळे दिवस आनंदात जाईल.

**धनु :** स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. संपूर्ण दिवस वातावरण होकारात्मक राहील. खाण्या-पिण्यात काळजी घ्या. दिवस आनंदात जाईल. मागील उधारी वसूल होईल.


**मकर :** मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात. कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. दिवस कालच्या इतका सकारात्मक जाणार नाही.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. हसत खेळत वेळ खर्च होईल.


**मीन :** आरोग्य नरम-गरम राहील. मित्र मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील. मागील उधारी वसूल होईल. आर्थिक करारांसाठी आजचा दिवस उत्तम आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१९० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१८९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) युरोप व आशिया खंडात पसरलेला एक मोठा देश जो पूर्वी सोविएत संघ होता ३) लाकूड कापण्याचे हत्यार ६) पाढ्यातील सहाची संज्ञा ७) अकबराच्या दरबारातील चतुर प्रधान ८) प्रत्येक महिन्याला ९) प्रजा; जनता ११) मस्ती; जोर; पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र १५) गोंधळ; गडबड; गदारोळ १७) गुणांची पारख करणारा १९) वर देणारा; प्रसन्न २०) हलणारे; विनाशी २३) निकाल; फडशा; किनारा; बाजू; शेवट २४) घराच्या मागची मोकळी जागा

**उभे शब्द :-** १) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा, शस्त्रे वगैरे २) केळी कुसकरून त्यात दूध व साखर घालून केलेले खाद्य ३) हात; सारा; हस्त; महसूल ४) एक स्थितिस्थापक पदार्थ ५) वर्तुळ; कडे ७) भारतातील एक घटकराज्य १०) एक चर्मवाद्य १२) आकाशात विहार करणारे; पक्षी १३) एक पालेभाजी १४) सहा ऋतूंपैकी एक १६) अरिष्ट; संकट; आपत्ती १८) डोंगराची तुटलेली बाजू; नदीचे उंच तीर २१) जखमेतून वाहणारा द्रव २२) पिसारा फुलविणारा भारताचा राष्ट्रीय पक्षी

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** सहन करणे पण शिकले पाहिजे, कारण आपल्यामध्ये कमतरता आहेत, ज्या इतर लोक सहन करतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पहिला बृहद् ज्ञानकोश- एनसायक्लोपीडिया केव्हा छापला गेला?

एनसायक्लोपीडिया म्हणजे सर्वसमावेशी शिक्षक. साधारणपणे आजकाल हा सर्वसमावेशक ज्ञानकोश हा एक किंवा अनेक खंडांत असतो. तो मानवी ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांची अकारविल्हे म्हणजे आद्याक्षरांप्रमाणे शब्दांची मांडणी करून माहिती देत असतो. याशिवाय काही विशिष्ट विषयांचे ज्ञानकोशही आजकाल उपलब्ध आहेत. यात वैद्यकीय, तांत्रिक विषयांचे शब्दकोश, तसेच मुलांसाठी सचित्र ज्ञानकोश असतात.

ज्ञानकोशाची सुरुवात स्पेयुसिप्पस याने इ. स. पू. ३३८ मध्ये केली. या ज्ञानकोशात इतिहास, गणित आणि तत्त्वज्ञान यांची माहिती होती. 'भारतात ऋषी आणि वेदपाठ करणारी मंडळी ही चालती बोलती ज्ञानकोशाची आवृत्ती; कारण त्या काळातले सर्व ज्ञान त्यांना मुखोद्गत असायचे.

प्लिनीनं ख्रि. पू. पहिल्या शतकात लिहिलेल्या ज्ञानकोशाचे ३७ खंड असून त्यांत ४५० लेखकांनी लिहिलेले २०,००० माहितीपूर्ण लेख आहेत. इ. स. १५३६ पर्यंत या 'नॅचरल हिस्टरी' नावाच्या ज्ञानकोशाच्या १४३ आवृत्ती निघाल्या.

इ. स. १४०३ ते १४०८ च्या दरम्यान चीनमध्ये राजाश्रयाने 'ग्रेट स्टॅंडर्ड एनसायक्लोपीडिया' या नावाचा पाच हजार वीस खंडांचा एक ज्ञानकोश लिहिला गेला. या ज्ञानकोशनिर्मितीस २००० तज्ज्ञ झटले. 'युनिव्हर्सल इंग्लिश डिक्शनरी ऑफ आर्टस् अँड सायन्स' हा पहिला अकारविल्हे लिहिलेला ज्ञानकोश हा जॉन हॅरिस या इंग्लिश धर्मगुरूने लिहिला होता.

छपाई कलेने युरोपात मूळ धरल्यावर सतराव्या आणि अठराव्या शतकात भराभर ज्ञानकोश छापले जाऊ लागले. 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका' हा तर फारच प्रसिद्ध ज्ञानकोश आहे. याची पहिली आवृत्ती इ. स. १७६८ मध्ये निघाली. आता या ज्ञानकोशाची अमेरिकन आवृत्ती निघते. या ज्ञानकोशाच्या ३० खंडांची किंमत २६००० रुपयांपर्यंत जाते आणि वजन अंदाजे ५५ किलो असते. दरवर्षी या ज्ञानकोशाच्या ५ लाखांपर्यंत प्रती खपतात. मराठीत पहिला ज्ञानकोश संकलित करण्याचे काम ज्ञानकोशकार केतकर यांनी केले. आता महाराष्ट्र शासनाने २० खंडांचा ज्ञानकोश जवळजवळ पूर्ण करायचे काम हाती घेतले असून काही खंड विक्रीस उपलब्ध केले आहेत.

### मुचकुंदाची कथा

पण आता पुन्हा जाऊन राज्य करण्याची मुचकुंदाची इच्छा नव्हती. त्याऐवजी श्रीकृष्ण भेटेपर्यंत आपणास गाढ निद्रा मिळावी, अशी मागणी मुचकुंदाने केली. त्यानुसार इंद्राने मुचकुंदास निद्रा दिली व जो तुला त्रास देऊन उठवील त्याचा नाश होईल, असे सांगितले.

पुढे कंसाला मारल्यामुळे जरासंध व श्रीकृष्ण यांच्यात वैर निर्माण झाले. सतरा वेळा मथुरेवर स्वारी करुनही जरासंधाचा पराभव झाला. पुन्हा एकदा जरासंध स्वारी करणार हे कळताच मथुरेची प्रजा श्रीकृष्णाकडे आली व आता हा अनर्थ थांबव, असे म्हणू लागली. इकडे जरासंधाने महापराक्रमी व ऋषींच्या वराने अजिंक्य झालेल्या कालयवन राजाची मदत घेतली व कालयवन त्याच्या सैन्यासह मथुरेस गेला. श्रीकृष्णाने विश्वकर्म्यास बोलावून रात्रीतल्या रात्रीत द्वारकानगरी वसवली. एवढेच नव्हे तर मथुरेतील सर्व लोक, पशू, पक्षी, चीजवस्तू हे सर्व रात्रीच्या रात्री द्वारकेस नेऊन ठेवले.

रात्रभर श्रीकृष्ण एकटाच मथुरेत होता. सकाळी बाहेर पडून कालयवना समोरुन तो जाऊ लागला. त्याला ओळखण्याच्या श्याम वर्ण, चार हातांत शंख, चक्र, गदा, कमळ व कमरेला पितांबर या जरासंधाने सांगितलेल्या खुणांवरुन कालयवन त्याला धरण्याचा प्रयत्न करू लागला. श्रीकृष्ण एकटा व निःशस्त्र असल्याने कालयवनही तसाच त्याच्या मागून जाऊ लागला. होता होता ते सैन्यापासून बरेच दूर आले. तेव्हा श्रीकृष्ण एका गुहेत शिरला. तेथे आधीच झोपलेल्या मुचकुंदाच्या अंगावर आपला पीतांबर पांघरून श्रीकृष्ण निघून गेला. पीतांबरामुळे हाच श्रीकृष्ण असे वाटून कालयवनाने मुचकुंदाला जागे करण्यासाठी लाथ मारली. पण इंद्राच्या वरदानामुळे कालयवन जागीच भस्म होऊ गेला. मुचकुंदास जाग आल्यावर वराचे स्मरण झाले. त्याने श्रीकृष्णाचे स्तवन केल्याबरोबर त्याला श्रीकृष्णाचे दर्शन झाले. कृष्णाने त्याला तू मोक्ष पावशील' असा वर दिला व नंतर श्रीकृष्ण तेथून द्वारकेस निघाला.

(पूर्ण)

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

वह चाहता है कि उसके बच्चे रूहानियत के ऐसे उपहार पाएँ, जो सोने और हीरे से बने लाखों-करोड़ों उपहारों को फीका कर दें। यह उसकी दुर्लभ दिव्य दया है कि आपको सही समझ का महान उपहार मिला है, ताकि आप हर चीज को सही नजरिये से देख सकें। आपको सतगुरु और उसके गुरु के अंतर में दर्शन के द्वारा जो दया से भरपूर संरक्षण मिला है, वह दिव्य दया की पराकाष्ठा है। वह हमेशा आपके साथ है और आप सौभाग्य से इस पवित्र सच्चाई को प्रमाणित कर रहे हैं। १७. आत्म निरीक्षण डायरी आपकी व्यक्तिगत वस्तु है, जिसके द्वारा आप सतुरु को अपने बारे में बताते हैं। यह नामलेवा को प्यार भरी याद दिलाती रहती है, ताकि वह रास्ते से भटक न जाएँ और यह उसकी हर रोज की तरक्की में भी सहायक होती है। और अगर तरक्की नहीं हो रही तो वह सोच सके कि ऐसा क्यों है। यह बहुत ही उपयोगी वस्तु है।

१८. एक आध्यात्मिक रूप से विकसित व्यक्ति अपने लेन-देन में ज्यादा शांत और सहनशील होगा, क्योंकि वह भली-भाँति जानता है कि यह दुनिया नाशवान् है और वह अपने परम पिता के सच्चे घर की यात्रा पर अग्रसर है। प्रभु प्रेम है; सतुरु प्रेम देहधारी है और जो कोई भी उसके पास आता है, वह प्यारा भरा मार्गदर्शन और संरक्षण पाता है। आप भाग्यशाली हैं कि आप इस सत्य का प्रमाण पा चुके हैं और आप दूसरों के लिए, जो भटक रहे हैं और भरसक कोशिश में हैं कि मुक्ति पा जाएँ, सहायक सिद्ध हो सकते हैं। जो सतुरु का कार्य निष्काम और प्रेम भाव से कर रहे हैं, उन्हें अवश्य ही सहायता और उभार मिलेगा। जो भटका हुआ और बेकार महसूस कर रहे हैं, वे अपने आपको नुकसान पहुँचा रहे हैं। मैं चाहता हूँ कि हर कोई दूसरे के विचारों को सुने, समझे और प्रेम से कार्य करे। १९. मुझे यह जानकर खुशी हुई कि आप सत्संग का आयोजन करने में सफलता पा रहे हैं। यह सर्वोच्च किस्म की सेवा है और केवल कुछ भाग्यशाली लोग ही दिव्य कार्य में सेवा के लिए चुने जाते हैं। आप आश्वस्त रहें कि सतुरु में विश्वास करके, जितनी ज्यादा नम्रता और पक्के इरादे से आप कोशिश करेंगे, उतना ही अधिक परमानंद और शांति आपके हिस्से में आएगी। आप नामलेवाओं को पवित्र भजन-सिमरन की और गुरु-शक्ति के सामने पूर्ण समर्पण की जरूरतों को जोर देकर समझाएँ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### विशुद्ध ऊर्जा चक्र

स्वतंत्रता के अभाव, बन्धन के विचार ये सब इस चक्र को असंतुलित करते हैं। आप क्रोध करते हैं और कहते हैं पता नहीं कैसे हो गया, मैं तो नहीं चाहता था। मेरे मुख से गाली निकल गई, माफ करना, मैं तो नहीं देना चाहता था, पता नहीं कैसे जबान फिसल गई। जो नहीं बोलना, बोलते हैं, जो नहीं करना, वह करते हैं। कई लोग बात करते हुए तकिया कलाम बोलते हैं या मां बहिन की गाली, यार यार, चालू, मुर्ख, घटिया, नीच, मोटा दिमाग, मटक मटक चाल, कुत्ता, कमीना कमीनी या किसी से झगड़ा होने पर अगर बहुत बुरे शब्द या गालियां निकलती हैं तो यह दर्शाता है कि विशुद्ध चक्र असंतुलित है।

हर रोज मीठे शब्द, अच्छे शब्द खोजते रहो पढ़ते रहो रिवाइज करते रहो तो यह चक्र संतुलित हो जायेगा। जो लोग अपशब्द बोलते हैं, उन के संग से बचना चाहिये।

चंदमा को देखें, बीच में शिव बाबा या ईष्ट को देखें और भगवान का सिमरण करें आप प्यार के सागर हैं, उस से मन में अच्छे विचार आयेगें। दूर के लोगों को मन से वरदान देते रहें। इस से यह चक्र जागृत हो जाता है। अगर हमारे संकल्प तमोगुणी हैं तो इस चक्र से ऐसी ध्वनियां निकलती रहती हैं जो रोग पैदा करती हैं। अगर लोगों को उल्टे जवाब देते हैं जिससे सघर्ष बढ़ता जाता है और काम धंधे, संबंधो में दरार आने लगती है तो यह दर्शाता है कि यह चक्र दूषित है। अगर रजोगुणी संकल्प हैं तो हम रजाई की बाते सोचते हैं, धन दौलत कमाते हैं। हम मेहनती बनते हैं। हम स्थूल साधनों, सुविधाओं और आपार धन दौलत कमाते हैं।

जब सतोगुणी संकल्प होते हैं तो विशुद्ध चक्र से मधुर ध्वनियां निकलती हैं। हमारी आवाज तोतली हो जाती है, जैसे महापुरुषों की होती है। दादी प्रकाशमणि, विवेकानन्द जैसी वाणी हो जाती है जिससे लाखों लोग शिष्य बन जाते हैं। योग बहुत अच्छा लगने लगता है। सबके प्रति कल्याणकारी बन जाते हैं।

इस चक्र को जागृत करने के लिए मन में सदैव सात्विक विचार रखें तो एक साधारण आदमी भी उतम योगी और महान पुरुष बन जाता है। आप हर रोज २० पेज सकारात्मक बुक्स पढ़ा करें तो आप के विचार सात्विक हो जाते हैं।

रूढ़पना इस चक्र का दुश्मन है। जितना रूढ बोलेंगें यह चक्र असंतुलित होता जायेगा तो हम बातूनी, बेकार और अंतहीन बातचीत करने लगते हैं जिससे सम्बन्ध बिगड़ते हैं। ज्यादा से ज्यादा पढ़ने से यह आदत छूट जाती है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

संतासिंग एका मायक्रोसॉफ्ट ऑफिसमध्ये इंटरव्हयूसाठी गेला

**बॉस :** जावा लँग्वेजचे चार व्हर्जन सांग

**संतासिंग :** मर जावा, मिट जावा, लूट जावा, सदके जावा

**बॉस :** वा व्वा! आता घरी जावा

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ आय.सी.सी.चे नवे अध्यक्ष कोण आहेत?

– जय शहा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

बालकाला द्यावा. मळमळ, उलटीचे प्रमाण जास्त असेल, तर ऊस चावून खावा. उसाचा थोड्या थोड्या अंतराने घोट-घोट पिण्यास द्यावा. पोटात आग पडत असेल, तर दूध व गुरगट्या भात खाण्यास द्यावा. या काळात मोड आलेली कडधान्ये व मांसाहार देऊ नये. कावीळ बरी। होण्यास साधारणतः तीन आठवडे लागतात. काविळीमध्ये डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधोपचार करावा.

हिपॅटायटीस 'ए' कावीळ होऊ नये म्हणून प्रतिबंधक लस उपलब्ध आहे. परंतु । ती खूप महाग असल्यामुळे ज्या भागात या काविळीची लागण जास्त प्रमाणात होते, तेथे दोन वर्षांखालील बालकांना काविळीची लस देण्याचा सल्ला देण्यात येतो. प्राथमिक लस दिल्यानंतर । व्यक्तीला एक वर्षापर्यंत संरक्षण मिळते आणि सहा महिन्यांनंतर पुन्हा देण्यात येणारा बूस्टर डोस । किमान वीस वर्षांपर्यंत संरक्षण पुरवितो. – काविळीमधील हिपॅटायटीस 'बी' हा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. याची लागण झाल्यावर यकृताचे गंभीर आजार व यकृताचा कॅन्सर इत्यादी रोग होऊ शकतात. दूषित रक्त अथवा शरीरातील द्रव यांच्याशी संपर्क आल्याने हा आजार पसरतो. याची लागण साधारणतः प्रसूतीदरम्यान, असुरक्षित लैंगिक संबंध, खराब वापरलेले इंजेक्शन व सुया, एकमेकांचा टुथब्रश, रेझर यांचा एकत्रित वापर केल्याने होऊ शकते. ताप, डोकेदुखी, मळमळ, उलटी, कावीळ या प्रकारची लक्षणे यात । आढळतात. प्रयोगशाळेमध्ये रक्तपासणी केल्यानंतर या आजाराचे निदान होते.

हिपॅटायटीस 'ए' या विषाणूचा संसर्ग झालेला रुग्ण हिपॅटायटीस 'बी' आणि 'सी'पेक्षा कमी। धोकादायक असतो. तरी काविळीच्या सर्व प्रकारांम ध्ये डॉक्टरांच्या सल्ल्याने निदान व उपचार करावेत.

अजीर्ण झाले असतानाही पुन्हा भोजन करणे. गोड, आंबट, खारट पदार्थांचे अति प्रमाणात सेवन करणे. आहारामध्ये गोड पदार्थ, पिष्टमय पदार्थ व गुळापासून बनविलेले पदार्थ अति प्रमाणात खाणे. व्यायाम न करणे, दुपारी झोपणे, विरुद्ध पदार्थ एकत्र करून खाणे ही कृमी रोग होण्याची । कारणे आहेत. दूषित पदार्थांचे सेवन करणे, पालेभाज्या स्वच्छ न धुता खाणे, माती खाणे या कारणांनी सुद्धा कृमी उत्पन्न होतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# ६ जून रोजी दुर्गराज रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा

### अहिल्यानगर जिल्ह्यातील मावळ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन



नगर – दुर्गराज रायगड, ६ व ७ जून रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा भव्य सोहळा यंदाही उत्साहात साजरा होणार आहे. राज्याभिषेक सोहळा समितीच्या संयोजनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे यांनी दिली.

या सोहळ्याच्या निमित्ताने 'धार तलवारची, युद्धकला महाराजांची', 'जागर शिवशाहीरांचा..स्वराज्याच्या इतिहासाचा' आणि 'सोहळा पालखीत, स्वराज्याच्या ऐश्वर्यात' यासारख्या विशेष कार्यक्रमांची सादरीकरणे होणार आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण पुन्हा उभा राहणार असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे दर्शन घडणार आहे.

या कार्यक्रमात छत्रपती संभाजी महाराज व युवराजकुमार शाहाजीरेज छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे ठळक आकर्षण :– ऐतिहासिक मिरवणुका आणि पालखी सोहळा, विविध सांस्कृतिक आणि शाहिरी कार्यक्रम, शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिके, महाराष्ट्रातील आणि देशभरातील शिवप्रेमींचा मोठा सहभाग, या सोहळ्यासाठी राज्यभरातील शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमाची तयारी जोमात सुरू आहे.

५ जून दु.३.३० वा.राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधीस अभिवादन करुन शिवराज्याभिषेक सोहळ्यास प्रारंभ (जिजाऊ समाधी स्थळ, पाचाड), दु.४ वा. युवराज संभाजी महाराज व युवराजकुमार शहजीराजे छत्रपती यांचे स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ (स्थळ : नाणे दरवाजा), दु.४.१५ वा. गडपूजन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या उपस्थितीत, (स्थळ : नगारखाना) दुपारी ४.३० वा. – युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या हस्ते 'धार तलवारीची.. युद्धकला महाराष्ट्राची... युद्धकलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ (स्थळः होळीचा माळ), सायं. वा. ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर. (स्थळः होळीचा माळ), रात्री ८ वा. – जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा... (स्थळः राजसदर), रात्री १ वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (स्थळ : शिरकाई मंदिर), रात्री ९.३० वा. – वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन (स्थळः अगदीश्वर मंदिर),

६ जून सकाळी ७ वा. – युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे हस्ते पारंपारिक वाद्यांच्या गजरात ध्वजपूजन व ध्वजारोहण (स्थळः नगारखाना), सकाळी ७.३० वा. शाहिरी कार्यक्रम (स्थळः राजसदर), सकाळी ९.३० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राजसदरेवर आगमन, सकाळी ९.५० वा. – युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे राजसदरेवर आगमन, सकाळी १० वा. – युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या हस्ते श्री शिवछत्रपती महाराजांच्या उत्सवमूर्तीस अभिषेक, सकाळी १०.२० वा. – श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारूढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक, सकाळी १०.३० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांचे शिवभक्तांना संबोधन, सकाळी ११ वा. 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा शिवराज्याभिषेक' पालखी सोहळ्यास प्रारंभ, दुपारी १२ वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे जगदीश्वर मंदिर येथे आगमन, दुपारी १२:१५ वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायास पंढरीच्या वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान (स्थळः जगदीश्वर मंदिर), दुपारी १२.२५ वा. – श्री शिवछत्रपती महाराजांच्या समाधीस अभिवादन.... असे कार्यक्रम होतील.

तरी या ऐतिहासिक सोहळ्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील मावळ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ओंकार व्यवहारे यांनी केले आहे.

# राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत अहिल्यानगरच्या विराज पिसाळने पटकाविले सुवर्णपदक

### एशियन युथ गेमसाठी भारतीय संघात नाव निश्चित होण्यास सर्वांच्या अपेक्षा



राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत विराज पिसाळने सुवर्णपदक पटकाविले.

नगर – येथील खेळाडू विराज गजेंद्र पिसाळ याने उत्तराखंड येथे राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. विराज हा अहिल्यानगरचा तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशन व एकलव्य तायक्कांदो अॅकॅडमीचा खेळाडू असून, त्याने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून यश संपादन केले. येणाऱ्या एशियन युथ गेमसाठी विराजची भारतीय संघात नाव निश्चित होण्यास सर्वांच्या अपेक्षा लागल्या आहेत.



इंडिया तायक्कांदो या देशातील एकमेव अधिकृत राष्ट्रीय संघटनेच्या वतीने उत्तराखंड येथे २९ मे ते १ जून दरम्यान राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धा पार पडली. यामध्ये विराजने प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकाविले. विराज केडगाव येथील एकलव्य तायक्कांदो अॅकॅडमीत मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. अहिल्यानगर बार असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष अॅड. गजेंद्र पिसाळ व शिक्षिका स्मिता पिसाळ यांचा तो मुलगा असून, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अंबादास पिसाळ यांचा नातू आहे.

या यशाबद्दल ग्रँड मास्टर अल्ताफ खान, एकलव्य तायक्कांदो अॅकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. माणिकराव विधाते, महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव घनश्याम सानप यांनी त्याचे अभिनंदन केले. तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफ्फार पठाण यांनी विराजला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# ऑस्ट्रीयाच्या इंटरनँशनल जॉग्राफी बी युरोपियन चँपियनशिप स्पर्धेत पार्थ होळेहुन्नूरचा डंका



नगर – अहिल्यानगरचे रहिवासी पण सध्या आयर्लंड येथे स्थायिक असलेले हर्षद होळेहुन्नूर यांचा मुलगा पार्थ होळेहुन्नूर याने नुकत्याच ऑस्ट्रीया येथील व्हिएन्ना येथे झालेल्या इंटरनँशनल जॉग्राफी बी युरोपियन चँपियनशिप स्पर्धेच्या अंतिम फेरीत दुसरा क्रमांक पटकावत यश मिळवले आहे. या स्पर्धेच्या झालेल्या दोन्ही फेरींमध्येही पार्थने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. पार्थ होळेहुन्नूर हा आयर्लंड मधील गालावे शहरातील क्लेरेगलवे स्कूल मध्ये इयत्ता ७ वीत शिक्षण घेत आहे. पार्थने यापूर्वी कुमाँन इंटरनँशनल मँथस स्पर्धेतही यशस्वी होत ट्रॉफी पटकावली होती.

पार्थ होळेहुन्नूर हा अहिल्यानगर येथील प्रा. व्यंकटेश होळेहोन्नुर यांचा नातु असून भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे व सारडा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी हर्षद होळेहुन्नूर यांचा मुलगा आहे.

# बुद्धीबळ खेळ गुण विकसित करण्यासाठी उपयुक्त

### डॉ. कृष्णा बलदवा यांचे प्रतिपादन; महेश नवमी निमित्त माहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने स्पर्धेचा शुभारंभ



महेश नवमीनिमित्तमाहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

नगर – महेश नवमीच्या निमित्ताने आयोजित ही बुद्धिबळ स्पर्धा समाजातील एकतेचे आणि प्रगतीचे प्रतीक आहे. आजच्या युगात मानसिक क्षमतांचे आणि निर्णयशक्तीचे महत्व वाढले आहे आणि बुद्धीबळ सारखा खेळ हे गुण विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. या स्पर्धेतून आपल्या समाजातील युवकांना नवे मार्गदर्शन मिळेल आणि त्यांच्या प्रतिभेला वाव मिळेल. अशा कार्यक्रमांना नेहमीच प्रोत्साहन मिळावे, असे प्रतिपादन डॉ.कृष्णा बलदवा यांनी केले.

महेश नवमीनिमित्तमाहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने बुद्धीबळ स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. कृष्णा बलदवा, अल्का बलदवा, मुकुंद धूत, विठ्ठलदास भुतडा, अतुल डागा, युवा संघटनेचे अध्यक्ष शाम भुताडा आदी उपस्थित होते.

डॉ. कृष्णा बलदवा म्हणाले की, महेश नवमीच्या निमित्ताने आयोजित ही बुद्धीबळ स्पर्धा समाजातील युवांमध्ये बुद्धिमत्ता, संयम आणि खेळातील कौशल्य वाढविण्यासाठी एक उत्तम मंच आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन अशा उपक्रमांना पाठिंबा द्यावा, यामुळे आपल्या समाजाची प्रगती निश्चित होईल. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

प्रास्तविकात शाम भुताडा म्हणाले की, युवकांना एक हक्काचं व्यासपीठ मिळाले, म्हणून माहेश्वरी युवा संगठनच्यावतीने दरवर्षी विविध स्पर्धांचे आयेजित केले जाते. यावर्षी बुद्धीबळ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास्पर्धेत समाजातील अनेक युवक सहभागी होऊन उत्तम प्रतिसाद दिला.

स्पर्धेचे परीक्षण यशवंत बापट यांनी केले, तर मनिष नावंदर यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली. प्रकल्प प्रमुख म्हणून मधुर बिहानी आणि शेखर असावा यांनी यशस्वी आयोजन केले. तसेच स्पर्धो यशस्वी करण्यासाठी संकेत मानधने, विशाल झंवर, अनिकेत बलदवा, गोविंदा जाखोटिया, सुमित चांडक, संग्राम सारडा, प्रतीक सारडा, पियुष झंवर, मुकुंद जाखोटिया, अभिनंदन कालाणि, ऋषीकेष बजाज आदींनी परिश्रम घेतले.

# पिक कर्जदार शेतकऱ्यांचा दोन लाख रुपयांचा अपघाती विमा जिल्हा बँक स्वनिधीतून उतरविणार



चेअरमन शिवाजीराव कर्डिले

नगर – अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पिक कर्जदार शेतकऱ्यांचा प्रधानमंत्री राष्ट्रीय सुरक्षा विमा अंतर्गत रुपये २ लाखाचा अपघाती विमा जिल्हा बँक आपल्या स्वनिधीतून उतरविणार असल्याचा निर्णय संचालक मंडळ सभेमध्ये झाला असल्याची माहीती बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर कर्जवितरण करण्यात येत असून जिल्ह्याच्या एकूण कर्जवितरणात जिल्हा बँकेचा सिंहाचा बाटा आहे. जिल्हा बँकेचे रुपे किसान क्रेडिट कार्ड धारक शेतकऱ्यांची संख्या चार लाखांच्या वर असून या शेतकरी सभासदांचे अपघाती विमा उतरविणेकरीता बँकेला रक्कम रुपये ८० लाखांच्या वर खर्च येणार असल्याची माहीती चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी देवून जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी सोसायटी माध्यमातून पिक कर्ज घेवून बँकेचे रुपे किसान क्रेडिट कार्ड घ्यावेत. ज्या शेतकऱ्यांनी अद्यापही रुपे किसान क्रेडिट कार्ड घेतलेले नसतील त्यांनी त्वरीत आपल्या बँकेच्या शाखेकडे रुपे किसान क्रेडिट कार्डची मागणी करण्याचे आवाहन चेअरमन शिवाजीराव कर्डिले व व्हाईस चेअरमन अॅड. माधवराव कानवडे यांनी केले.

या विम्याबाबत अधिका माहीती देताना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्षे यांनी सांगितले की, बँकेकडून अपघाती विमा उतरविण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यु झाल्यास रुपये २ लाखाची भरपाई मिळेल तसेच अपघातात एक अवयव निकामी झाल्यास ५०%, दोन अवयव निकामी झाल्यास १००% नुकसान भरपाई मिळणार आहे. परंतू नैसर्गिक मृत्यु झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. ही योजना केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री राष्ट्रीय सुरक्षा विमा योजने अंतर्गत असून त्यांचे नियम व अटी यांना लागू राहणार असल्याची माहीती श्री.वर्षे यांनी दिली.

# अहिल्याबाईंच्या आदर्श मार्गावर चालून समाजसेवेचा संकल्प

### काका शेळके यांचे प्रतिपादन; सूर्या फाउंडेशनच्यावतीने अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती उत्साहात साजरी




सूर्या फाउंडेशनच्यावतीने अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नगर – अहिल्याबाई होळकर या महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासातील आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेतल्यास आपण समाजसेवा, शिक्षण, स्त्री सक्षमीकरण यामध्ये मोठी भर घालू शकतो. सूर्या फाउंडेशनच्यावतीने आम्ही त्यांच्या विचारांचे अनुसरण करत आहोत आणि हेच आमचे ध्येय आहे, असे प्रतिपादन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काका शेळके यांनी केले.

सूर्या फाउंडेशनच्यावतीने अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी काका शेळके यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी माजी नगरसेविका कलावती शेळके, सारिका शेळके, शारदा शेळके, नितीन पल्ले, अथर्व आवटी, शेखर ढुमणे, संग्राम शेळके, कृष्णा टपळे, लक्ष्मण कासार, विश्वास वाघमारे, भोसले सर, राजू चव्हाण, लोढा भाभी, समर्थ शेळके, कपिल काटकर, वैष्णव हरबा, रोहन मोटे आदी उपस्थित होते.

काका शेळके यांनी पुढे सांगितले, अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कर्तृत्वातून समाजातील शोषित घटकांना मदत केली. त्यांच्या आदर्शांवर चालत आम्ही देखील ओबीसी, महिला, विद्यार्थी, शेतकरी यांच्यासाठी विविध उपक्रम राबवत आहोत. सूर्या फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, खेळ, आणि सामाजिक एकोप्याचे कार्य पुढे नेणार आहोत.

या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण होते. उपस्थित मान्यवरांनी सूर्या फाउंडेशनच्या कार्याची प्रशंसा केली आणि अहिल्याबाई होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनावर प्रकाश टाकला.

# सेवा, बलिदान आणि करुणा दिवस म्हणून गुरु अर्जुन देवजी यांचा शहिदी दिवस साजरा

### घर घर लंगर सेवेच्या वतीने वाळकी व खडकी गावात जनावरांसाठी चारा वाटप



मुक्या जनावरांना चारा उपलब्ध करुन गुरू अर्जुन देवजी यांना अभिवादन करण्यात आले.

नगर – कोरोना काळापासून गरजूंची भूकभागविणाऱ्या गुरू अर्जुन देवजी सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवेच्या वतीने शीख धर्माचे पाचवे गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिवस सेवा, बलिदान आणि करुणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. माणसांच्या संकटकाळात धावून जाणारी लंगर सेवा प्राण्यांची भूक भागविण्यासाठीही धावली. मुसळधार पावसाने थैमान घातलेल्या व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न उद्ववलेल्या नगर तालुक्यातील वाळकी व खडकी गावात जनावरांसाठी चारा वाटप करण्यात आले. मुक्या जनावरांना चारा उपलब्ध करुन गुरू अर्जुन देवजी यांना आगळ्या–वेगळ्या पध्दतीने अभिवादन करण्यात आले.

डॉ. जुंदरे आणि डॉ. अनिल कराळे (जिल्हा परिषद) यांनी सदर गावातील जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याची माहिती दिली. यावर घर घर लंगर सेवेने तातडीने प्रतिसाद देत गुरू अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने ४ टन चारा जुंदरे वस्तीत पाठविण्यात आला. चारा वितरणाची संपूर्ण प्रक्रिया डॉ. अनिल कराळे व वाळकी येथील मुराद शेख यांच्या देखरेखीखाली पार पडली.

जनावरांना योग्य वेळेत चारा उपलब्ध करुन देण्यासाठी घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून पुढाकार घेण्यात आला होता. जुंदरे वस्तीच्या परिसरात संपूर्ण घरात व शेतात पाणी शिरल्याने पिकांचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. लंगर सेवेने केलेल्या मदतीबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले.

भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. दिलीप भालसिंग यांनी घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून नैसर्गिक संकटात जनावरांसाठी तात्काळ मदत उपलब्ध केल्याबद्दल या उपक्रमाचे कौतुक करुन आभार व्यक्त केले. लंगर सेवेच्या माध्यमातून या परिसरातील जनावरांसाठी ४ टन चारा पाठविण्याचे उपक्रम हाती घेण्यात आले आहे. एका वेळचा १५ हजार रुपये खर्च असून, या सामाजिक कार्यास हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी हरजितसिंग वधवा, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, मुन्नाशेठ जग्गी, किशोर मुनोत, सुनील थोरात, राजा नारंग, जतीन आहुजा, अनिश आहुजा, सुनील छाजेड, विपुल शहा, राहुल बजाज, किशोर रंगलानी, राजू जग्गी, कैलास नवलानी, सिमरजीत वधवा, दलजीतसिंग वधवा, राजेश कुकरेजा, कैलास ललवाणी, मन्नू कुकरेजा, प्रमोद पंतम, शरद बेरड, अमरजीत वधवा, सतीश गंभीर, संदेश रपारिया आदी प्रयत्नशील आहेत.



शहर भाजपच्या व्यापारी आघाडीच्या वतीने सर्जेपुरा चौकातील पुरातन पंचमुखी महादेव मंदिराच्या नूतनीकरणास ४१ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. मदतीचा धनादेश मंदिराचे पुजारींकडे सुपूर्द करताना शहर भाजपचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते. यावेळी महेश गुगळे यांच्यासह व्यापारी आघाडीचे व शहर भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पंचमुखी महादेव मंदिराच्या नूतनीकरणास भाजप व्यापारी आघाडीकडून आर्थिक मदत


नगर – अहिल्यानगर शहर भाजपच्या व्यापारी आघाडीच्या वतीने शहरातील सर्जेपुरा चौकात असलेल्या पुरातन पंचमुखी महादेव मंदिराच्या नूतनीकरणाच्या कामास ४१ हजार रुपयांची आर्थिक मदत केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादिवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. शहर भाजपचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते मंदिराचे पुजारी सुधीर पंडित व देवेन परदेशी यांच्याकडे मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी व्यापारी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष महेश गुगळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी पंचमुखी महादेवाची विधिवत आरती करण्यात आली. प्रास्ताविकात सरचिटणीस प्रशांत मुथा यांनी सर्वांचे स्वागत करून उपक्रमाची माहिती दिली. यावेळी व्यापारी आघाडीचे सरचिटणीस हर्षल बोरा, उपाध्यक्ष नीरज राठोड, लक्ष्मिकांत तिवारी, सुरेश लालबागे, संजय कांगला, नीरज राठोड, रुपेश वर्मा, शहर जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, सावेडी मंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, मध्यमंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ, पंडित वाघमारे, गोपाल वर्मा, सचिन पळशीकर, रोहित पठारे, राजू वाडेकर, डॉ. करमरकर, अनिल निकम, किशोर रायमोकर, दीपक देहरेकर, वैभव लांडगे, कालिंदी केसकर, रेणुका करंदीकर, श्वेता झोंड, सविता कोटा, जयश्री पंडित आदी उपस्थित होते. पंडित वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करून अभीष्टचिंतन करण्यात आले.

# अर्थजगत

## जून महिना ‘परंपरा’ राखणार का ?

जगातील चौथी अर्थव्यवस्था बनलेल्या भारताच्या शेअर बाजारासाठी मे २०२५ हा महिना तेजीची परंपरा कायम ठेवणारा ठरला. विशेष म्हणजे सलग तीन महिने भारतीय शेअर बाजाराने तेजीची पताका फडकावत ठेवली आहे. यामुळे गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झले आहे. मे महिन्यामध्ये



शेअर बाजारातील दोन प्रमुख निर्देशांक हृ असणाऱ्या निफ्टी आणि सेन्सेक्स मध्ये जवळपास दोन टक्क्यांपर्यंतची वाढ नोंदली गेली. उल्लेखनीय बाब म्हणजे, मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांमध्ये अधिक तेजी दिसून आली. यामुळे संपूर्ण बाजारात उत्साही वातावरण निर्माण झाले. निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांकामध्ये मे महिन्यात ६.१ टक्क्यांची वाढ नोंदली गेली आहे; तर निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांकाने तर तब्बल ८.७ टक्क्यांची झेप घेतली. या जबरदस्त कामगिरीमुळे काही प्रमुख निर्देशांकांनी वर्षाच्या सुरुवातीच्या दोन महिन्यांत झालेल्या नुकसानीवर मात करत स्थैर्य प्राप्त केले आहे. भारतीय शेअर बाजाराचे एकूण बाजार भांडवल (मार्केट कॅप) मे महिन्यात १९.४ लाख कोटी रुपयांनी वाढून ४४५.५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये बाजाराने एकूण ५८ लाख कोटी रुपयांचे नुकसान अनुभवले होते. मात्र मार्च महिन्यापासून सुरू झालेल्या जोरदार सुधारणामुळे आता बाजाराने ६१ लाख कोटी रुपयांची वाढ पुन्हा प्राप्त केली आहे. या तेजीत संस्थागत गुंतवणूकदारांचा महत्त्वाचा वाटा आहे.

विशेषतः विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी मे महिन्यात सुमारे २०,००० कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. देशांतर्गत म्युच्युअल फंडांनी तर एफआयआयच्या दुपटीहून अधिक म्हणजे ४७,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक भारतीय शेअर बाजारात केली आहे. या भरीव संस्थात्मक खरेदीमुळे बाजारात स्थैर्य निर्माण झाले असून, आगामी काळातही सकारात्मक दिशेने वाटचाल होण्याची शक्यता आहे. येत्या काळात जागतिक घडामोडी, निवडणूकांचे निकाल आणि व्याजदर धोरण यांवर बाजाराची दिशा अवलंबून राहणार आहे.गतसप्ताहात जून सीरिजच्या पहिल्याच दिवशी बाजार घसरणीसह बंद झाला. सेन्सेक्स १८२ अंकांनी घसरून ८१,४५१ वर तर निफ्टी ८३ अंकांनी घसरून २४,७५१ वर बंद झाला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक जवळपास स्थिर बंद झाले. मात्र, निफ्टी बँक निर्देशांकाने काहीशी वाढ दर्शवली. ३० मे रोजी सर्वाधिक तेजी सरकारी बँकांच्या शेअर्समध्ये दिसून आली. त्याचवेळी मेटल, आयटी, ऑटो, तेल-गॅस या क्षेत्रांमध्ये विक्रीचा दबाव राहिला.

सद्यस्थितीत निफ्टीसाठी २४,९०० हा महत्त्वाचा अडथळा ठरत आहे. निफ्टीने हा स्तर पार केल्यास बाजारात चांगली तेजी येण्याची शक्यता आहे. २५,०२५ च्या वर बाजारात जोरदार शॉर्ट कव्हरिंग येऊ शकते. निफ्टीने २१,८०० च्या नीचांकी स्तरापासून सुमारे १४% वाढ दाखवली आहे. आता निफ्टीने जर २५,१०० चा ब्रेकआउट केला, तर २५,५०० पर्यंत हा निर्देशांक झेप घेऊ शकतो.

बँक निफ्टीचा विचार करता येणाऱ्या काळात बँकिंग क्षेत्रातील समभागांमध्ये खरेदीचा जोर असाच राहिल्यास हा निर्देशांक ५६,५५० ते ५६,८०० पर्यंत झेपावू शकतो. निफ्टीच्या तुलनेत बँक निफ्टीमध्ये अधिक चांगली ‘बार्गेनिंग पॉवर’ दिसत आहे. संस्थागत गुंतवणूकदारांकडून होणारा गुंतवणूक प्रवाह सध्या बाजाराला आधार देत आहे. भारताच्या विदेशी गंगाजळीत एका आठवड्यात ७ अब्ज डॉलर्सने झालेली वाढ उत्साह वाढवणारी आहे.

भारताचा चौथ्या तिमाहीतील जीडीपी वाढीचा दर ७.४% इतका नोंदवला गेला असून तो बाजाराने अपेक्षित धरलेल्या ६.७% या अंदाजापेक्षा जास्त आहे. संपूर्ण आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ही वाढ ६.५% इतकी राहिली आहे. जगभरात आर्थिक वाढीबाबत चिंता कायम आहे. यामागे मुख्य कारण म्हणजे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत घसरण झाली आहे. यामुळे फेडरल रिझर्व्हच्या भविष्यकालीन धोरणात्मक निर्णयांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. चालू आठवड्यात व्याजदरकपातीच्या वाढत्या शक्यतांचा बाजारावर प्रभाव राहील. याशिवाय, मासिक ऑटो विक्री आणि व्हॉल्युम डेटा जाहीर होणार असल्याने ऑटोमोबाईल क्षेत्रातील समभागांवर लक्ष ठेवून राहावे लागेल. ट्रम्प यांनी ४ जूनपासून स्टील आणि ॲल्युमिनियमवरील आयात शुल्क दुप्पट करून ५० टक्के करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे भारतीय निर्यातीवर थेट परिणाम फारसा होणार नसला तरी जागतिक स्तरावर मागणी कमी झाल्यास किंमती आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. या निर्णयामुळे मेटल स्टॉक्समध्ये अस्थिरता दिसून येऊ शकते. बँकिंग, ऑटो, रिअल इस्टेट ही क्षेत्रे सध्या सकारात्मक दिसताहेत.

**वेध बाजाराचा**

चालू आठवड्यात प्रामुख्याने दोन घडामोडींबाबत बाजार कसा प्रतिसाद देतो यावर पुढची दिशा अवलंबून असणार आहे. पहिली घडामोड म्हणजे भारताच्या जीडीपीचे आकडे. याबाबत चालू तिमाहीतील वाढीकडे सकारात्मकतेने पहायचे की गेल्या चार वर्षांतील नीचांकी पातळी म्हणून पाहिले जाणार यावर बाजाराची दिशा ठरेल. दुसरी घडामोड आहे, ट्रम्प यांच्या घोषणांची. स्टील व ॲल्युमिनियमवर टेरीफ लादण्याचा निर्णय घेतल्यानंतर ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तानबाबत केलेल्या वक्तव्यांत २६ जूनपर्यंत भारत-अमेरिका यांच्यातील करार पूर्णत्वास जाऊ शकतो, असेही म्हटले आहे. ही बाब सकारात्मक आहे. भारत यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. पण यातील संदिग्धता आणि दृष्टिकोनातील फरक यामुळे बाजारात चालू आठवड्यात पुन्हा एकदा घुसळण दिसू शकते. चालू आठवड्यात बाजारात घुसळण दिसू शकते. त्यामुळे बाजाराचा कल आणि आपली जोखीम क्षमता पाहून रणनीती ठरवा. स्टॉपलॉसचा वापर करतानाच वेळोवेळी आपला नफा बुक करायला विसरु नका.

◆◆◆




**जाणून घ्या**

## भाडेकरू आणि घरमालकांनी होम इन्शुरन्स घ्यावा का ?

*नवीन काळातील घर विमा योजना अत्यंत लवचिक स्वरुपात उपलब्ध होत आहेत. उदाहरणार्थ, एसबीआय जनरल इन्शुरन्सची फ्लेक्सी होम इन्शुरन्स योजना फक्त आगीपासून संरक्षण हे अनिवार्य आहे. उर्वरित संरक्षण ग्राहक आपल्या गरजेनुसार निवडू शकतो.*

**मालकांसाठी आवश्यक विमा संरक्षण**

१ **इमारतीसाठी विमा** : घरमालकांनी त्यांच्या इमारतीचे विमा संरक्षण घ्यावे. हे संरक्षण आग, भूकंप, वादळ, पूर, दरड कोसळणे, दंगल, दहशतवाद इत्यादी धोके लक्षात घेऊन असावे.

२ **सामग्री विमा** : जर मालकाने घर भाड्याने दिले असेल आणि ते फर्निश्ड म्हणजेच फर्निचर, उपकरणे इत्यादींसह असेल, तर त्या सामग्रीसाठी विमा आवश्यक आहे.

३ **भाडे नुकसान विमा** : मालकाचे उत्पन्न संपूर्णपणे भाड्यावर अवलंबून असेल आणि घर नादुरुस्त झाल्यामुळे ते काही काळ वापरण्यास अयोग्य झाले तर हा विमा त्याकाळातील भाड्याचे नुकसान भरतो.

४ **भारत गृह रक्षा योजना :** ही घर व त्यातील वस्तूंसाठी सर्वसमावेशक संरक्षण देणारी मानक योजना आहे. यामध्ये घरातील सामग्री आपोआप विमा संरक्षणाखाली येते (विमा रकमेच्या २०% पर्यंत). त्याशिवाय भाडे नुकसानासाठी अतिरिक्त पर्यायही उपलब्ध आहे. गृहविमा घेताना विमा रक्कम ही पुनर्बांधणी मूल्यावर आधारित असावी. याचा अर्थ, घर पुनर्रचनेसाठी लागणाऱ्या सध्याच्या खर्चानुसार विमा रक्कम ठरवली जाते. ही पद्धत मार्केट व्हॅल्यूपेक्षा अधिक लाभदायक ठरते. कारण यात मूल्यघट गृहित धरली जात नाही.

**गृहविम्यात काय वगळले जाते ?**

- युद्ध किंवा युद्धासारख्या परिस्थितीत नुकसान
- विमाधारक किंवा त्यांच्या कुटुंबाने मुद्दाम केलेली हानी
- दुय्यम आर्थिक नुकसान
- प्रदूषण, गंज, वृद्धत्वामुळे झालेले नुकसान
- उंदीर, कीटक व इतर कीडमुळे झालेले नुकसान
- १०% पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे संरचनात्मक बदल
- अनधिकृत बांधकाम किंवा दोषपूर्ण डिझाइन

**भाडेकरूंनी कोणते विमा संरक्षण घ्यावे ?**

भाडेकरूंनी त्यांच्याकडील टीव्ही, लॅपटॉप, कपडे, फर्निचर इत्यादींसाठी विमा घ्यावा. हे संरक्षण आग, चोरी, पूर, नैसर्गिक आपत्तींपासून मिळते.

जर भाडेकरूने अपघाताने मालकाच्या घराचे नुकसान केले, तर हा विमा खर्च भरतो.

दागदागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, महागडे कपडे इत्यादींसाठी विमा घेताना त्या वस्तूंचे मूल्य स्पष्ट करावे. हाय व्हॅल्यू वस्तूंसाठी खरेदी किंमतीवर आधारित गणना करावी.

इतर घरगुती वस्तूंसाठी अंदाजे एकूण किंमत निश्चित करता येते.

भाडेकरूंसाठी विमा धोरणात- मुद्दाम केलेले नुकसान, नियमित झिज, युद्धजन्य परिस्थिती, विमा दावा तयार करण्यासाठी आलेला खर्च, स्थलांतर करताना झालेले नुकसान (जोपर्यंत ट्रान्झिट कव्हर घेतले नाही), अघोषित मौल्यवान वस्तू हे वगळले जाते.

**५ वर्षांसाठी काही विमा कंपन्यांचे प्रीमियम**

- बजाज आलियान्झ- १३,८०६ रुपये
- युनायटेड इंडिया - १४,१८९रुपये
- एसबीआय - १४,४३८रुपये
- डिजिट- १५,७६०रुपये
- रिलायन्स- १५,८००रुपये

ही रक्कम भारत गृह रक्षा योजनेसाठी असून त्यात १ कोटी इमारतीचे आणि ३० लाख सामग्रीचे संरक्षण आहे. ◆◆◆

## मालमत्ता खरेदी आणि टीडीएस



**माहीत हवे**

मालमत्तेच्या खरेदीविक्रीच्या व्यवहारांमध्ये टीडीएस भरणा महत्त्वाचा ठरतो. जर कोणीही व्यक्ती फ्लॅट, प्लॉट, घर यांसारखी एखादी अचल मालमत्ता ५० लाखांहून अधिक किंमतीला खरेदी करत असेल, तरच त्या व्यवहारावर टीडीएस लागू होतो. उदाहरणार्थ, जर दोन व्यक्तींनी एक मालमत्ता संयुक्तपणे खरेदी केली असेल आणि त्या मालमत्तेची एकूण किंमत ९६ लाख रुपये असेल तर दोघांचाही वाटा प्रत्येकी ४८ लाख रुपये असेल. अशा वेळी टीडीएस लागू होणार नाही. कारण वैयक्तिक रक्कम ५० लाखांच्या मर्यादेपेक्षा कमी आहे.

**टीडीएस दर किती आहे ?**

सध्याच्या कायद्यानुसार, मालमत्ता खरेदीवर लागू होणारा टीडीएस दर १ टक्के आहे. हा दर सर्वसमावेशक आहे. म्हणजेच याखेरीज कोणताही सेस किंवा अधिभार वेगळा भरावा लागत नाही.

टीडीएस हा मालमत्तेच्या एकूण व्यवहाराच्या रकमेवर लागू होतो. १ एप्रिल २०२२ पासून यात ॲग्रीमेंटमधील मूल्य किंवा स्टॅम्प ड्युटीचे मूल्य जे अधिक असेल, तो ग्राह्य धरला जातो. यामध्ये क्लब सदस्यत्व शुल्क, कार पार्किंग शुल्क, वीज किंवा पाणी कनेक्शनसाठी शुल्क, देखभाल शुल्क, आगाऊ रक्कम यांचा समावेश करण्यात आला आहे.

**कोणत्या व्यवहारांवर टीडीएस लागू होत नाही ?**

➔ ज्या मालमत्तेची किंमत ५० लाखांपेक्षा कमी आहे.

➔ ज्या जमिनी ग्रामीण शेतीसाठी आहेत आणि महानगरपालिकेच्या हद्दींपासून २ ते ८ किलोमीटर अंतरावर आहेत (लोकसंख्या १०,००० ते १० लाख दरम्यान असल्यास) अशा जमिनींसाठी टीडीएस लागू होत नाही.

**टीडीएस कधी कपात करायचा आणि सरकारला कधी भरायचा ?**

**● टीडीएस कसा भरावा ?**

मालमत्ता खरेदीदाराने फॉर्म २६क्यूबी भरावा लागतो. हा फॉर्म भरल्याशिवाय टीडीएस भरता येत नाही, त्यामुळे दोन्ही प्रक्रिया एकत्र कराव्या लागतात. हा फॉर्म म्हणजे टीडीएस कपात आणि त्याचा तपशील असलेले विवरण आहे.

- टीडीएस उशिरा भरल्यास दर महिन्याला १.५% व्याज आकारले जाते.
- फॉर्म २६क्यूबी उशिरा भरल्यास रोज २०० दंड आकारला जातो.
- मालमत्ता खरेदी करताना टीडीएसची जबाबदारी खरेदीदारावर असते.

- टीडीएस खालीलपैकी जी प्रक्रिया आधी होईल त्या वेळी कपात करावा लागतो:
- विक्रेत्याला रक्कम प्रत्यक्ष दिली जाते तेव्हा
- विक्रेत्याच्या नावावर देयता नोंदवली जाते तेव्हा

जर मालमत्ता बांधकामाधीन अवस्थेत खरेदी केली असेल, तर प्रत्येक हप्त्यावर टीडीएस कपात करावा लागतो. टीडीएस कपात केलेल्या महिन्याच्या शेवटून पुढील ३० दिवसांच्या आत सरकारकडे जमा करावा लागतो. ◆◆◆

## चुकीचा आयटीआर फॉर्म भरल्यास...

आपण मिळवलेल्या उत्पन्नासंदर्भातील विवरण आयकर विभागाला आयटीआरच्या माध्यमातून कळवणे हा एक आर्थिक शिस्तीचा आणि जबाबदारीचा भाग आहे. पण या जबाबदारीचे पालन करत असताना योग्य विवरणपत्र निवडणे आणि त्यामध्ये योग्य माहिती भरणे या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. चुकीचा आयटीआर फॉर्म भरल्यास किंवा चुकीची माहिती दिल्यास त्याबाबत आयकर विभागाकडून कारवाई केली जाऊ शकते.

मुळात चुकीचा आयटीआर भरला असेल आयकर विभाग तुमचे रिटर्न वैध मानत नाही. उदाहरणार्थ, भांडवली नफा मिळवलेला असूनही आपण जर आयटीआर-१ भरल्यास तुम्ही रिटर्न भरलेच नाही असे समजले जाते.

**टॅक्स झोन**

आयकर कायद्याच्या कलम १३९ (९)नुसार इनकम टॅक्स डिपार्टमेंटकडून आपले रिटर्न डिफेक्टिव्ह असल्याचे नमूद केलेली नोटिस पाठवली जाते. ही नोटीस तुमच्या नोंदणीकृत ई-मेलवर व आयकर विभागाच्या पोर्टलवर दिसते.

त्यामध्ये कोणती चूक झाली आहे (उदा. चुकीचा फॉर्म, अपूर्ण माहिती) हे स्पष्ट केलेले असते.

नोटीस आल्यावर तुम्हाला ती विशिष्ट कालमर्यादेमध्ये दुरुस्त करावी लागते. अन्यथा, तुमचा रिटर्न पूर्णतः अमान्य ठरतो. चुकीचा फॉर्म वापरल्यामुळे तुमचा रिफंड देण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही. तुम्ही भरलेला कर परत मिळण्याची शक्यता कमी होते. चुकीच्या विवरणामुळे तुमचे उत्पन्न चुकीचे दाखवले गेले असल्यास, दंड व व्याज आकारले जाऊ शकते. प्रसंगी आयकर विभाग तुमच्यावर दोषारोप करू शकतो.




**उपाय काय?**

- फॉर्म भरण्यापूर्वी तुमच्या उत्पन्नाचे स्वरूप नीट समजून घ्या. आवश्यक असल्यास तज्ज्ञ सल्ला घ्या.
- फॉर्म २६एएस व वार्षिक माहिती निवेदन (एआयएस) तपासा. लक्षात ठेवा, आयकर विवरण हा कायदेशीर दस्तऐवज आहे. फक्त व्याज किंवा पगार असलेल्या व्यक्तीस आयटीआर-१ सोपा वाटतो, परंतु एखादा छोटासा भांडवली नफा मिळालेला असेल किंवा दुसरे उत्पन्न असल्यास चुकीचा फॉर्म वापरू नका. तुम्ही जर गुंतवणूकदार, फ्रीलांसर असाल किंवा मालमत्ता विकली असेल तर आयटीआर-२ किंवा आयटीआर-३ वापरणे योग्य ठरते.

## बीएसएनएलचा ताळेबंद सुधारला

बीएसएनएल या सरकारी कंपनीला चौथ्या तिमाहीत २८० कोटी रुपयांचा नफा झाला आहे. १८ वर्षात सलग दुसर्या तिमाहित या कंपनीला नफा झाल्याबद्दल केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांनी समाधान व्यक्त केले.

गेल्या वर्षी चौथ्या तिमाहीत या कंपनीला ८४९ कोटी रुपयांच तोटा झाला होता. हा कंपनीचा नफा ढोबळ नसून निव्वळ नफा आहे सर्व कर दिल्यानंतर हा नफा झाला आहे हे ध्यानात घेण्याची गरज असल्याचे मत शिंधीया यांनी व्यक्त केले. तिसऱ्या तिमाहीत कंपनीला २६२ कोटी रुपयांचा नफा झाला होता. या तिमाहीत कंपनीचा महसूल ७.८% वाढून २०,८४१ कोटी रुपये इतका झाला आहे.

## १९ हजार कोटींचा नफा

लाइफ इन्शुरन्स कार्पोरेशन म्हणजे एलआयसीला चौथ्या तिमाहीत झालेला नफा तब्बल ३८ टक्क्यांनी वाढून १९,०१३ कोटी रुपये इतका झाला आहे. गेल्या वर्षी चौथ्या तिमाही या कंपनीला १३,७६३ कोटी रुपयांच्या नफ्यावर समाधान मानावे लागले होते. मात्र या तिमाहीमध्ये एलआयसीचा महसूल कमी होऊन २,४१,६२५ कोटी रुपये इतका झाला आहे. गेल्या वर्षी चौथ्या तिमाहीत २,५०,९२३ कोटी रुपये इतका होता. गेल्या वर्षी या कंपनीला ४०,६७६ कोटी रुपयांचा नफा झाला होता. एलआयसीने आपल्या भागधारकासाठी प्रति शेयर १२ रुपये लाभांश जाहीर केला आहे.

## आढावा जून महिन्यातील नियमबदलांचा

***जून २०२५ पासून लागू होणाऱ्या आर्थिक आणि तांत्रिक नियमांमध्ये मोठे बदल होणार आहेत, ज्याचा थेट परिणाम तुमच्या दैनंदिन व्यवहारांवर आणि मासिक बजेटवर होऊ शकतो. खालीलप्रमाणे या बदलांची माहिती दिली आहे.***



**पीएफ काढणे आता अधिक सोपे**

एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायजेशन जून २०२५ मध्ये ईपीएफओ ३.० प्रणाली सुरू करणार आहे. यामुळे: यामुळे युपीआय आणि एटीएमच्या माध्यमातून पीएफ काढणे त्वरित शक्य होईल. सदस्यांना त्यांच्या खात्याचा शिल्लक थेट युपीआय प्लॅटफॉर्मवर पाहता येईल आणि निधी त्यांच्या पसंतीच्या बँक खात्यात ट्रान्सफर करता येईल.



**आधार अपडेटची अंतिम मुदत** : आधार अपडेट करण्याची अंतिम तारीख १४ जून ही निश्चित करण्यात आली आहे. ऑनलाइन अपडेटसाठी २५ रुपये शुल्क लागेल. आधार केंद्रावर अपडेट करण्यासाठी ५० रुपये शुल्क आकारले जाईल.

**क्रेडिट कार्ड नियमांमध्ये बदल :** एचडीएफसी, ॲक्सिस आणि कोटक महिंद्रा या बँकांनी त्यांच्या क्रेडिट कार्ड धोरणांमध्ये बदल केले आहेत. एचडीएफसीच्या टाटा न्यू इन्फिनिटी आणि टाटा न्यू प्लस कार्डधारकांना त्यांच्या व्यवहारांच्या आधारे लाउंज ॲक्सेस व्हाउचर्स दिले जातील.ॲक्सिस बँकेने त्यांच्या रिवॉर्ड क्रेडिट कार्डसाठी पॉइंट्स मिळवण्याच्या नियमांमध्ये बदल केला आहे.

**मुदत ठेवींच्या व्याजदरात बदल**

जून महिन्यात बँका त्यांच्या मुदत ठेवींच्या व्याजदरांमध्ये बदल करू शकतात. सध्याच्या परिस्थितीत अधिकांश एफडी व्याजदर ६.५% ते ७.५% दरम्यान आहेत. रेपो दरात बदल झाल्यास या व्याजदरांवर परिणाम होऊ शकतो.

**टीडीएस प्रमाणपत्र (फॉर्म १६) मिळवण्याची अंतिम तारीख:** १५ जून करदात्यांनी त्यांच्या नियोक्त्यांकडून टीडीएस प्रमाणपत्र १५ जून २०२५ पर्यंत मिळवणे आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र वेतनातून वजावट केलेल्या कराची पुष्टी करते. आयकर रिटर्न भरण्यासाठी आवश्यक आहे.



**युपीआय व्यवहारांमध्ये प्राप्तकर्त्याचे नाव दिसणार :** ३० जून २०२५ पासून, सर्व युपीआय ॲप्सवर व्यवहार करताना प्राप्तकर्त्याचे सत्यापित नाव दिसेल. यामुळे, क्युआर कोड फसवणुकीपासून संरक्षण मिळेल. व्यवहार अधिक सुरक्षित आणि पारदर्शक होतील.

**म्युच्युअल फंड कट-ऑफ वेळेत बदल :** सेबीने ओव्हरनाईट म्युच्युअल फंडसाठी नवीन कट-ऑफ वेळा निश्चित केल्या आहेत. त्यानुसार ऑफलाइन व्यवहारांसाठी दुपारी ३ वाजेपर्यंत, ऑनलाइन व्यवहारांसाठी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत मुदत असणार आहे.

**एटीएम व्यवहार शुल्कात वाढ :** फ्री ट्रान्झॅक्शनची मर्यादा ओलांडल्यानंतर केल्या जाणाऱ्या एटीएम व्यवहारांवर लागणारे शुल्क वाढण्याची शक्यता आहे. यामुळे वारंवार पैसे काढणाऱ्या ग्राहकांना अतिरिक्त शुल्क लागेल.

**युटिलिटी बिल भरण्यावर अतिरिक्त शुल्क :** क्रेडिट कार्डद्वारे वीज, पाणी यांसारखी युटिलिटी बिले भरताना काही बँका अतिरिक्त शुल्क लागू करू शकतात. ◆◆◆

## म्युच्युअल फंड पोर्टफोलिओमधील ‘ओव्हरलॅप’चा धोका

**शेअर बाजारातील गुंतवणुकीत जोखीम कमी करत स्थिर परतावा मिळवण्यासाठी म्युच्युअल फंड पोर्टफोलिओचे योग्य प्रकारे डायव्हर्सिफिकेशन करणे आवश्यक असते. मात्र अनेक वेळा गुंतवणूकदार याचा अतिरेक करण्याच्या नादात एका भूलभुलैय्यात अडकतात. हा भूलभुलैय्या म्हणजे एकाच प्रकारच्या किंवा समान समभागांमध्ये गुंतवणूक करणारे बरेच फंड घेतले जातात. त्यामुळे ‘ओव्हरलॅप’ चा धोका उद्‌भवतो.** थोडक्यात, आपण गुंतवणूक केलेल्या दोन फंडांनी समान समभागात गुंतवणूक करणे. उदाहरणार्थ, जर एचडीएफसी टॉप १०० फंड आणि आयसीआयसीआय प्रु ब्लूचिप फंड दोघांनीही टाटा मोटर्स कंपनीच्या शेअरमध्ये ५ टक्के भांडवल गुंतवले असेल, तर त्या दोन फंडांमध्ये ५ टक्के ‘ओव्हरलॅप’ आहे असे म्हणता येते.




**फंड झोन**

**ओव्हरलॅप होण्याची शक्यता का वाढते ?**

भारतातील म्युच्युअल फंड इंडस्ट्रीतील एकूण इक्विटी एयूएमपैकी ६०% हिस्सा केवळ टॉप १०० समभागांमध्येच गुंतवलेला असतो. यामुळे वेगवेगळ्या फंड मॅनेजर्सनासुद्धा तेच शेअर्स आकर्षित करतात. परिणामी, एकाच स्टॉक्समध्ये गुंतवणूक केली जाण्याची शक्यताही असतेच.

**ओव्हरलॅप का टाळावा ?**

सामान्यतः वेगवेगळ्या क्षेत्रातील आणि वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये पैसा वाटण्यासाठी आपण वेगवेगळ्या फंडांमध्ये पैसा गुंतवतो. पण ओव्हरलॅपिंगमुळे म्हणजेच सर्व फंडांनी समान शेअर्समध्ये गुंतवणूक केली असेल तर हा हेतूच फोल ठरतो. जर त्या ठराविक शेअर्सचे भाव अचानक कोसळले तर आपले नुकसान होऊ शकते. समान शेअर्स असलेल्या वेगवेगळ्या फंडांवर वेगळी मॅनेजमेंट फी लागते. याचाच अर्थ एकाच गोष्टीसाठी तुम्ही डबल फी भरत असता!

सामान्यतः लार्ज कॅप फंडांमध्ये सरासरी ४७ टक्क्यांपर्यंत ओव्हरलॅप आढळतो. काही ठिकाणी तर ६०% पेक्षा जास्त असतो.

ईएलएसएस (टॅक्स सेव्हिंग फंड) मध्ये ३०% ते ८०% पर्यंत ओव्हरलॅप.

फलेक्सी कॅप फंडांमध्ये सरासरी २५% ओव्हरलॅप पाहायला मिळते; तर काही उदाहरणांत ५० टक्क्यांपेक्षा अधिक!

साहजिकच, यामुळे तुमची जोखीम वाढते. तसेच पोर्टफोलिओत वैविध्य राहात नाही.

ओव्हरलॅपिंग टाळण्यासाठी आपल्या पोर्टफोलिओमधील प्रत्येक म्युच्युअल फंडाच्या टॉप १० होल्डिंग्ज तपासा. जर तुम्हाला तेच-तेच समभाग वारंवार दिसत असतील तर याचा अर्थ तुमच्या पोर्टफोलिओमध्ये जास्त प्रमाणात ओव्हरलॅपिंग आहे.

व्हॅल्यू रिसर्च, मॉर्निंगस्टार, वन फायनान्स यांसारखे प्लॅटफॉर्म पोर्टफोलिओ ओव्हरलॅपचे विश्लेषण करतात. ही साधने तुमच्या होल्डिंग्जमध्ये समान स्टॉक आणि सेक्टर शोधण्यात मदत करु शकतात. ◆◆◆

# पुरामुळे आरोग्य केंद्रात साचलेला गाळ काढण्यासाठी खासदार निलेश लंके यांनी स्वतः हातात घेतले फावडे

## आपत्तीग्रस्त गावांमध्ये खासदार प्रतिष्ठानकडून रस्ते, पुलांची दुरूस्ती मोहीम


वाळकी (ता. नगर) येथील आरोग्य केंद्रात पुरामुळे साचलेला गाळ काढताना खा. निलेश लंके, बाळासाहेब हराळ यांच्यासह स्वयंसेवक.

नगर – आपत्तीग्रस्त खडकी, अकोळनेर, वाळकी, अस्तगांव, सारोळा कासार, भोरवाडी, जाधववाडी, सोनेवाडी या गावांमध्ये १ जून रोजी दिवसभर निलेश लंके प्रतिष्ठान तसेच आपला मावळा संघटनेच्या वतीने श्रमदानाची मोहीम राबवत विविध रस्ते, पूल तयार करण्यात आले. वाळकी येथील आरोग्य केंद्रात साचलेला गाळ काढण्यासाठी खा.निलेश लंके स्वत: हातात फावडे घेवून गाळात उतरले. या आरोग्य केंद्राची धुवून स्वच्छता करण्यात आली.

गेल्या आठवड्यात २७ मे रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे या गावांतील रस्ते, पूल वाहून गेले. जनावरे दगावली. या आपत्तीनंतर खा. लंके यांनी या भागाची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी संसार उघड्यावर पडलेल्या नागरिकांना किराणा तसेच जनावरांचा चारा उपलब्ध करून देत नागरीकांना दिलासा दिला.

विविध गावांमध्ये मोठया प्रमाणावर नुकसान झाल्याने खा. लंके यांनी संपूर्ण नुकसानीचा आढावा घेऊन निलेश लंके प्रतिष्ठान तसेच आपला मावळा संघटनेच्या माध्यमातून मदत मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला.अनेक ठिकाणी रस्ते व पु पूल वाहून गेले होते, ते दुरूस्त करण्यात आले. सकाळी ९ वाजल्याच्या सुमारास सर्व गावांमध्ये एकाच वेळी या कामांना सुरूवात करण्यात आली. खा. लंके यांनी यावेळी विविध गावांमध्ये जात या मदतकार्यात सहभाग नोंदविला.

### गाळ साचलेल्या आरोग्य केंद्राची स्वच्छता

वाळकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पूलाचे पाणी शिरल्यामुळे केंद्रात चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले होते. चार फुटापर्यंत पाणी साचलेल्या या केंद्रास खा. लंके यांनी भेट दिल्यानंतर त्यांनी स्वतः हाती फावडे घेत संपूर्ण केंद्रातील गाळ उचलण्यात आला. गाळ उचलण्यात आल्यानंतर संपूर्ण इमारत धुवून काढण्यात आली. पाणी शिरल्यामुळे आरोग्य केंद्रातील उपचार बंद होते. निलेश लंके प्रतिष्ठानची रूग्णवाहिका मागविण्यात येऊन येणाऱ्या रूग्णांवर उपचारही सुरू करण्यात आले.

या मोहिमेत अकोळनेर येथे महेत्रे वस्तीला जोडणारे ३ पूल व रस्ता, जाधववाडीला जोडणारे वाहून गेलेले २ पूल, दरोडी मळयाला जोडणारा वाहून गेलेला २०० मिटर रस्ता, थोरात वस्तीला जोडणारा रस्ता,सारोळा रस्ता ते देशमुख मळा रस्ता दुरुस्ती, अस्तगांव येथे खेकड दरा, तरोडी वस्ती, नाणेकर वस्ती, गाढवे वस्ती रस्ते दुरुस्ती, वाळकी येथे बाजारतळावरील नदीलगतचा वाहून गेलेला भराव, जुंदरे वस्तीवरील विविध रस्ते, पुरामध्ये वाहून गेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावण्यात आली. भोरवाडी येथे नवीन खडकवाडीला जोडणारा पूल ९० टक्के वाहून गेला होता. तो पूल तयार करण्यात आला. वड वस्ती–खैरे वस्ती वाहून गेलेल्या रस्त्याबरोबरच मुरमीकरण करत छोटे मोठे रस्ते खुले करण्यात आले. खडकी येथे खडकी ते जाधववाडी अकोळनेर रस्ता दुरुस्ती, सारोळा कासार येथे सारोळा कासार ते काळे मळा रस्त्यावरील पुल, दत्त मंदीर रस्ता, काळेवस्ती ते जाधववाडी रस्ता, स्मशानभूमी दुरूस्ती करण्यात आली.

### यांत्रिक उपकरणे आणि ४०० स्वयंसेवक

५० जेसीबी, २२ ढंपर, ३० ट्रॅक्टर, ५ पोकलेनच्या मदतीने नीलेश लंके प्रतिष्ठान तसेच आपला मावळा संघटनेचे ४०० स्वयंसेवक तसेच स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने ही मोहीम राबविण्यात आली. याशिवाय या मोहीमेत सहभागी झालेल्या खाजगी व शासकीय डॉक्टरांच्या टीमने अतिवृष्टीमुळे ज्या ग्रामस्थांना आजार झाले आहेत, त्यांची तपासणी करून उपचार करण्यात आले, औषधेही देण्यात आली.

### शेतकऱ्यांच्या जनावरांची तपासणी

पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या टीमने प्रत्येक गावातील प्रत्येक गोठ्यात जाऊन जनावरांची तपासणी केली. आवश्यक तिथे उपचार करून औषधेही देण्यात आली. या टीममध्येही ३५ खाजगी व शासकीय अधिकारी सहभागी झाले होते. भोरवाडी येथील शेतकऱ्याच्या गायीच्या पोटातील वासरू आडवे आले असता टीमधील डॉ. कासार व डॉ. जगताप यांनी तिथे जावून सेवा दिली. त्यामुळे गाय व वासरू दोघांचेही प्राण वाचले.

# वाळकीच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे कामकाज झाले सुरळीत

## आठवडे बाजारही भरला, खा. निलेश लंके यांच्या मदत मोहीमेचा परिणाम


खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली वाळकी येथील आरोग्य केंद्रात मदत कार्य राबविण्यात आल्याने आरोग्यसेवा सुरळीत झाली.

नगर – गेल्या आठवड्यात नगर तालुक्यातील काही गावांमध्ये अतिवृष्टी होऊन झालेल्या नुकसानीनंतर १ जून रोजी खा. निलेश लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या–त्या गावांमध्ये जात केलेल्या मदत कार्यामुळे तेथील जनजीवन सुरळीत झाले आहे. वाळकी येथील गाळाने माखलेले प्राथमिक आरोग्य केंद्र चकाचक करण्यात आल्याने ते २ जून पासून सुरळीत सुरू झाले, आठवडे बाजार भरला तर जुंदरे मळयातील रस्ताही सुरू झाला आहे.

सारोळा कासार येथील वाहून गेलेला स्मशानभुमीचा भाग भराव टाकून पुर्ववत करण्यात आला. काळे मळयाचा रस्ता दोन पुल दुरूस्त करून सुरळीत करण्यात आला. बारवे मळयातील दत्त मंदिराकडे जाणारा रस्ता तसेच अकोळनेर ते सारोळा शिवरस्ता खा. लंके यांच्या मावळयांनी दुरूस्त केला.

भोरवाडीच्या वाळुंबा नदीवरील पडलेला पुल दुरूस्त करण्यात आल्याने खडकवाडी येथील शेतक–यांचे दळणवळण सुरळीत झाले. दुग्ध व्यवसायिकांना डोक्यावर किटली घेऊन दूध संकलन केंद्राकडे जावे लागत होते त्या रस्त्यावरील पुलाचे व खैरेवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम करण्यात आल्याने दूध संकलनही सुरळीत झाले. पुल वाहून गेल्याने दळवी वस्तीचा संपर्क तुटला होता, पुलाची दुरूस्ती झाल्याने दळवी वस्तीचेही दळणवळण पुर्ववत झाले.

अकोळनेर येथील तरोडी मळा, मेहेत्रे वस्ती, थोरात वस्ती, देशमुख मळयाचा संपर्क तुटला होता. त्या त्या भागातील पूल व रस्त्यांची दुरूस्ती करण्यात आल्याने ग्रामस्थांचे जाणे येणे सुरळीत झाली. खडकी येथील जाधववाडी व अकोळनेर हा रस्ता पुल वाहून गेल्याने बंद झाला होता. हा पूलही दुरूस्त झाल्याने रखडलेली वाहतूक पुर्ववत झाली.

### खा. लंकेंमुळे आरोग्यसेवा सुरळीत

खासदार निलेश लंके यांनी स्वतः मदत कार्यात झोकून देत आरोग्य केंद्रात साचलेला गाळ स्वतः भरला. अग्निशमन दलाचे वाहन पाचारण करून संपूर्ण आरोग्य केंद्र स्वच्छ करण्यात आले. खा. लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी अपार कष्ट घेउन स्वच्छता मोहिम राबविल्याने सोमवारपासून रूग्णसेवा सुरळीत झाली असल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. अनिल ससाणे यांनी सांगितले.

### आपत्ती काळातील लोकप्रतिनिधीचे आदर्श उदाहरण

खा. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेली ही मदत मोहिम केवळ तातडीची मदत नव्हे तर पुनर्बांधणीचा एक ठोस प्रयत्न होता. शासनाच्या मदतीची वाट न पाहता स्थानिक पातळीवर राबविण्यात आलेली ही व्यापक मोहीम आपत्ती काळात लोकप्रतिनिधीने कसे पुढे यावे याचे आदर्श उदाहरण ठरले आहे. निलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा संघटनेचे मावळे यांनी खासदार नीलेश लंके यांच्या आवाहनास प्रतिसाद देत निष्ठेने राबविलेले मदत कार्य आपत्तीग्रस्तांच्या कायम स्मरणात राहील, असे माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ यांनी सांगितले.

# ठेवीदारांचे पैसे अडकलेल्या ध्येय मल्टिस्टेटच्या ४ शाखांवर छापे; महत्वाची कागदपत्रे, संगणक केले जप्त

नगर – ध्येय मल्टिस्टेटच्या सुमारे सात कोटी ६० लाख रूपयांच्या अपहार प्रकरणी दाखल गुन्ह्यात तोफखाना पोलिसांनी मल्टिस्टेटच्या कर्जत, राशीन, कुळधरण, बिटकेवाडी या शाखेत छापेमारी करून महत्वाचे कागदपत्रे, संगणक तपासकामी जप्त केले आहेत. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

ध्येय मल्टिस्टेट निधी लिमीटेड पतसंस्थेने जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून व नंतर कोणत्याही प्रकारचा परतावा न देता पतसंस्था बंद करून ठेवीदारांच्या पैशांचा अपहार केल्याप्रकरणी ठेवीदार सुजाता संदीप नेवसे (रा. शिंदे मळा, सावेडी) यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चेअरमन विशाल लक्ष्मण भागानगरे (रा. पंचपीर चावडी, माळीवाडा), व्हा. चेअरमन रोहिदास सत्यदेव कवडे, संचालक व सीईओ राहुल बबन कराळे (रा. टोकेवाडी ता. नगर), संचालक गणेश कारभारी कराळे (रा. आगडगाव ता. नगर), पुजा विलास रावते व विलास नामदेव रावते (दोघे, रा. बोरूडे मळा, सावेडी) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून सर्व संशयित पसार झाले आहेत. त्यातील व्हा. चेअरमन रोहिदास कवडे याला तोफखाना पोलिसांनी फेब्रुवारी महिन्यात अटक केली होती. दोघांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. उर्वरीत संशयित आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, या गुन्ह्याचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे. त्यासाठी एका संस्थेची नेमणुक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ऑडिट सुरू करण्यात आले आहे. तपासकामी मल्टिस्टेटच्या विविध शाखेमधील महत्वाचे कागदपत्रे पोलिसांना आवश्यक होती. त्यासाठी निरीक्षक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अमोल गायधनी, अंमलदार सुनील शिरसाठ, सुनील खाडे यांच्या पथकाने कर्जत, राशीन, कुळधरण, बिटकेवाडी या शाखेत छापे टाकले. तेथील कॅशबुक, ठेव पावती पुस्तके, अकाउंट रजिस्टर, आवक– जावक रजिस्टर, कर्मचारी हजेरी रजिस्टर, संगणक तपासकामी जप्त केले आहेत. अधिक तपास सुरू आहे.

### १८४ ठेवीदारांचे ७.६० कोटी अडकले

ध्येय मल्टिस्टेचचा गुन्हा दाखल झाला त्यावेळी सुमारे ११२ ठेवीदारांचे सुमारे पाच कोटी ७८ लाख रूपयांच्या अपहार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते. पोलिसांनी तपास सुरू केल्यानंतर फसवणुकीचा आकडा वाढला आहे. सुमारे १८४ ठेवीदारांचे सुमारे सात कोटी ६० लाख रूपये अडकले असल्याचे समोर आले आहे. यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचारप्रकरणी एकास १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

नगर – अल्पवयीन मुलीवर शारीरिक अत्याचार केल्याप्रकरणी विशेष जिल्हा न्यायाधीश, श्रीमती माधुरी एच. मोरे यांनी शिरीष उर्फ मुन्ना भाउसाहेब कावले, (वय ३८, रा.कावलेवस्ती, शहर टाकळी, ता. शेवगाव) यास दोषी धरुन १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा तसेच ५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली.

या खटल्याची थोडक्यात हकिकत अशी की यातील आरोपी शिरीष कावले २६ जानेवारी २०२३ रोजी अल्पवयीन मुलगी घरी एकटी असताना पाणी पिण्याच्या बहाण्याने जाऊन पीडित मुलीशी प्रेमाने बोलून लग्नाचे आमिष दाखवून तसेच आई–वडिलांना मारण्याची धमकी देऊन बळजबरीने अत्याचार केला. त्यानंतर आरोपीने वारंवार पीडित मुलीवर अत्याचार केला त्यातून पीडित मुलगी गर्भवती झाली. ही बाब मुलीच्या घरच्यांच्या लक्षात येतात त्यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात जून २०२३ मध्ये बलात्काराचा गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा संपूर्ण तपास शेवगाव येथील सहा. पोलीस निरीक्षक आशीष शेळके यांनी करुन न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकुण १८ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी वकीलांचा युक्तीवाद तसेच आलेला संपूर्ण पुरावा ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीस वरीलप्रमाणे शिक्षा ठोठावली

या खटल्याचे कामकाज विशेष सरकारी वकील श्रीमती ॲड. मनिषा केळगंद्रे – शिंदे यांनी पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी पोलीस अंमलदार रेश्मा अडसूळ, अशोक बेळगे, तसेच मुळ फिर्यादीतर्फे ॲड. जनार्दन एकलहरे यांनी सहकार्य केले.


गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करणाऱ्या टोळीचा हद्दपारीचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर या टोळीला ताब्यात घेतलेले कोतवाली पोलिसांचे पथक.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करुन विक्री करणारी टोळी अहिल्यानगर जिल्ह्यातून १ वर्षासाठी हद्दपार

नगर – कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत झेंडीगेट परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांसविक्री करणाऱ्या टोळीस अहिल्यानगर जिल्ह्यातून १ वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

वारंवार गोमांस विक्री करणारे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांवर कायद्याचा धाक रहावा याकरिता ही टोळी हद्दपार करणेबाबत वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कोतवाली यांनी सबळ पुराव्याअंती महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ५५ अन्वये टोळीप्रमुख ओवेस रशीद शेख, (वय २४, रा. आंबेडकर चौक, शाळा क्र. ४, झेंडीगेट,अ.नगर) टोळी सदस्य शोएब रौफ कुरेशी, (वय २८, रा. कारी मस्जिद जवळ, बाबा बंगाली, अ.नगर) फैसल अस्लम शेख, (वय १९, रा. हमालवाडा, आंबेडकर चौक, झेंडीगेट, अ.नगर) मुसाबीर युनुस कुरेशी, (वय २२, रा. झेंडीगेट, अ.नगर) यांचे विरुध्द हद्दपार प्रस्ताव तयार करुन पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयात मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता.

या टोळीच्या हद्दपारीच्या प्रस्तावाचा व्यापक विचार करुन ओवेस शेख, शोएब कुरेशी, फैसल शेख, मुसावीर कुरेशी यांना अ.नगर जिल्ह्याचे स्थळसिमेच्या हद्दीतुन एक वर्षाकरिता हद्दपार केलेबाबत आदेश पारित केला आहे. आदेश प्राप्त होताच कोतवाली पोलिसांनी हद्दपार टोळीस ताब्यात घेऊन अ.नगर जिल्ह्याचे स्थलसिमेच्या हद्दीबाहेर सोडण्यात आले आहे.

# कत्तल करण्यासाठी डांबून ठेवलेल्या गायीची सुटका


कत्तल करण्यासाठी डांबून ठेवलेल्या गायीची सुटका केल्यानंतर तिच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर – कत्तल करण्याच्या उद्देशाने एका खोलीमध्ये डांबून ठेवलेल्या गाईची कोतवाली पोलिसांनी सुटका केली आहे. ही कारवाई झेंडीगेट परिसरातील बाबा बंगाली चौक येथे सार्वजनिक शौचालयाच्या बाजूस १ जून रोजी केली.

कोतवाली पोलिसांना माहिती मिळाली की, गोवंशीय जनावरे हे झेंडीगेट परिसरातील बाबा बंगाली चौक, शासकीय शौचालयाचे उजव्या बाजुला एका खोलीत कत्तलीसाठी डांबून ठेवलेली आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलिसांनी त्या ठिकाणी जावुन खात्री केली असता एका दहा बाय दहा चे बंदीस्त खोलीमध्ये कोणीतरी एक गाय बांधुन ठेवलेली दिसली. पोलिसांनी तिची सुटका केली.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमा विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९७६ चे कलम ५ (अ), ९ तसेच प्राण्यांना कुरतेने वागवण्यास प्रतिबंध करणेबाबत अधिनियम १९६० चे कलम ११ प्रमाणे गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलीस हवालदार ए पी इनामदार हे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे आदेशान्वये पोलीस अंमलदार आर.ए. दरंदले, सचिन लोळगे, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे यांनी केली आहे.

# प्रवासी म्हणून बसलेल्या दोघांनी रिक्षाचालकास मारहाण करुन लुटले

## कल्याण रोडवर नेवून मोबाईल व रिक्षा घेवून झाले पसार

नगर – रिक्षात प्रवासी म्हणून बसलेल्या दोन अनोळखी इसमांनी रिक्षा चालकास लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्याच्याकडील ऑटो रिक्षा व मोबाईल फोन बळजबरीने चोरुन नेल्याची घटना माळीवाडा ते बसस्थानक रोडवरील संग्राम वाईंन्स ते कल्याण रोडवरील ढवळपुरी फाटा या दरम्यान १ जून रोजी पहाटे ५ ते सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत रिक्षा चालक रवींद्र काशिनाथ लांडगे (वय ३५, रा. पिंपळगाव लांडगा, ता. नगर ) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी हे एक जून रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास रिक्षा चालवत असताना त्यांना शहरातील माळीवाडा परिसरातील संग्राम वाईन्स दुकानासमोर दोन प्रवाशांनी त्यांना हात करुन थांबवले. फिर्यादी यांनी त्यांना कोठे जायचे आहे असे विचारले असता त्यातील एकाने मला कल्याण रोड बायपास उड्डाणपूलाजवळ सोडून याला परत कोठी रोडला आणून सोड असे सांगितले.

फिर्यादी यांनी दोघांना रिक्षात बसून नेप्ती नाका मार्गे कल्याण रोड बायपासला नेले. त्यावेळी रिक्षामधील दोघेही इसम खाली उतरले व त्यांनी काहीएक न बोलता फिर्यादी यांना मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना मला कशासाठी मारतात मी तुम्हाला काय बोललो आहे असे म्हटले असता त्यांनी रिक्षा चालू ठेव असे बोलून ते पुन्हा रिक्षात बसले व रिक्षा सरळ वेगाने चालव आम्ही जोपर्यंत थांब बोलत नाही तोपर्यंत थांबायचे नाही असे म्हटले. पुढे रिक्षा घेऊन कल्याण रोडने ढवळपुरी फाट्याजवळ नेले. तेथे दोघांनी फिर्यादीस थांबवून खाली उतरुन त्यांचे शर्ट, पॅन्टचे खिसे तपासून खिशातील पाच हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादीची रिक्षा (क्र. एम एच २० टी ३५ ८९ ) बळजबरीने चोरुन घेऊन गेले. याप्रकरणी रवींद्र लांडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी दोन अनोळखी इसमाविरुद्ध बी एन एस कलम ३०९ (६), ३ (५) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला. तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख करीत आहेत.

# महावितरणच्या अधिकाऱ्यांवर हल्ला करणारे दोघे गजाआड

नगर – महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर हल्ला करून त्यांच्याकडील दोन हजार रूपये बळजबरीने काढून घेणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. सागर बाप्पुसाहेब म्हस्के व शेहबाज निसार सय्यद (दोघे रा. पाटील कॉलनी, म्हसोबा चौक, केडगाव) अशी त्यांची नावे आहेत.

३० मे रोजी महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल शीतराम शीलावंत (वय ३५, रा. शाहूनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी सांगितले की, पहाटे ०३:१५ वाजता रंगोली चौक, केडगाव येथे लाईटचा फॉल्ट तपासण्याचे काम करत असताना दोन इसमांनी येऊन शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यांनी सरकारी कामात अडथळा आणत खिशातील दोन हजार रूपये जबरदस्तीने काढून घेतले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला व गुन्ह्याचा तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना माहिती मिळाली की संशयित आरोपी पळून जाण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ कांदा मार्केट रस्ता, केडगाव येथे सापळा रचला व तात्काळ कारवाई करत सागर बाप्पूसाहेब म्हस्के व शेहबाज निसार सय्यद यांना अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सपकाळे, अंमलदार पितळे, दळवी, दरंदले, दीपक रोहकले, तानाजी पवार, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, सुरज कदम, राम हंडाळ, सचिन लोळगे, महेश पवार व महिला अंमलदार नांगरे यांनी केली आहे.

# मुलानेच केले आईवर कोयत्याने वार

नगर – किरकोळ करणावरुन पोटच्या मुलांनेच जन्मदात्री आईचा गळा दाबून कोयत्याने वार केले. ही घटना नगर तालुक्यातील जखणगाव येथील घरासमोरील गोठ्यात २८ मे रोजी दुपारी घडली.

या बाबत जनाबाई बाबासाहेब भिसे (वय ५६, रा.जखणगाव, ता. नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या घरासमोर असलेल्या गोठ्यात गाईचे दुध काढत असताना सुर्यकांत बाबासाहेब भिसे (रा.जखणगाव ता. नगर) हा तेथे आला व त्याने विचारले की माझी बायको व मुले कोठे आहेत. त्यावेळी फिर्यादी या त्याला म्हणाले की, तुला पुण्याला बोलावले आहे. असे म्हणाल्याचा त्याला राग आल्याने त्याने शिवीगाळ करुन फिर्यादीचा गळा दाबला असता, फिर्यादी यांनी त्यास ढकलले. त्यांनतर त्याने ऊस तोडायच्या कोयत्याने फिर्यादीवर वार केला असता फिर्यादी यांनी डावा हात मध्ये घातला असता डाव्या हाताचे मधले बोटाला जखम होवुन फॅक्चर झाले. त्यानंतर सुर्यकांत यांने फिर्यादी डोक्यात कोयत्याने वार केला असता फिर्यादी या जागीच बेशुध्द झाल्या. त्यानंतर सुर्यकांत हा तुम्हाला जिवंत सोडणार नाही असे म्हणून निघून गेला.

या प्रकरणी जनाबाई भिसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नगर तालुका पोलिसांनी सुर्यकांत भिसे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (२), ३५२. ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

पुढील तपास पोलीस हवालदार जगदीश जंबे करीत आहेत.

# सावेडी उपनगरात भरदिवसा घरातून चोरी; ४ तोळे सोन्याचे दागिने लंपास

नगर – अज्ञात चोरट्याने एका घराचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेत, आत प्रवेश करून सुमारे चार तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. सावेडी उपनगरातील गाडेकर चौकातील रेणाविकर कॉलनीत ३१ मे रोजी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चेतन बाळासाहेब जगदाळे (वय ३०, रा. रेणाविकर कॉलनी, गाडेकर चौक, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ३१ मे रोजी सकाळी ८.३० वाजता ते आपल्या कुटुंबासह कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यावेळी त्यांच्या आई रंजना घरी एकट्याच होत्या. रंजना या कपडे धुण्यासाठी टेरेसवर गेल्यानंतर साधारणतः ९.४५ वाजता घरात परतल्या असता त्यांना घरातील दुसऱ्या मजल्यावरील बेडरूमचे कपाट उघडे व कपडे अस्ताव्यस्त स्थितीत पडलेले आढळले.

कपाटाची तपासणी केली असता त्यात ठेवलेले सोन्याचे दागिने यामध्ये ३० ग्रॅम वजनाचे गंठण व १० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र गायब असल्याचे निदर्शनास आले. याबाबत कुटुंबीयांनी घरात शोधाशोध केली, मात्र दागिने सापडले नाहीत. घराचा मुख्य दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून ही चोरी केली असावी, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

